cmyk

## संपादकीय

### मी रबरी शिक्का नाही

भारतीय लोकशाहीचे सौंदर्य तिच्या 'चेक अँड बॅलन्स' व्यवस्थेत दडलेले आहे. संसद, न्यायपालिका, कार्यपालिका आणि माध्यम हे या लोकशाहीचे चार मुख्य आधारस्तंभ मानले जातात. मात्र, गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहता, या स्तंभांची आणि इतर स्वायत्त संस्थांची स्वायत्तता धोक्यात आल्याची ओरड सातत्याने होत आहे. दोन दिवसापूर्वी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधीनी प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात हि ओळ सगळ्यात महत्वाची आहे.ती म्हणजे मी रबरी शिक्का नाही.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५६ | शुक्रवार दि.१५ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### अवकाळी हाहाकार! यूपीत ५६ जणांचा मृत्यू,

प्रयागराज : राजधानी दिल्लीसह उत्तर भारतात वादळी वा–याने हाहाकार माजवला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. बुधवारी उत्तर प्रदेशात वादळी वा–यासह झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने भीषण परिस्थिती निर्माण केली. निसर्गाच्या या कोपामुळे राज्याच्या विविध भागांत घडलेल्या दुर्घटनांमध्ये तब्बल ५६ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, या पावसामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.वादळ आणि पावसामुळे उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांत घरांची पडझड झाली आहे. सर्वाधिक जीवितहानी प्रयागराज आणि भदोही जिल्ह्यांत झाल्याची माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून वीजपुरवठाही खंडित झाला आहे. अवकाळी पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून शेतक–यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

### कर्नाटकमधील हिजाब बंदीचा आदेश मागे

बंगळुरू : कर्नाटक सरकारने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये हिजाब बंदी घालणारा २०२२ चा निर्णय मागे घेतला आहे. नवीन आदेशानुसार, विद्यार्थ्यांना हिजाब व्यतिरिक्त कलावा, रुद्राक्ष आणि जानवे घालण्याचीही परवानगी देण्यात आली आहे. कर्नाटकच्या तत्कालीन भाजप सरकारने फेब्रुवारी २०२२ मध्ये एक आदेश जारी केला होता. त्यानुसार, सरकारी प्री–युनिव्हर्सिटी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना निर्धारित गणवेशाचे पालन करणे अनिवार्य करण्यात आले होते.आदेशात म्हटले होते की, समानता, एकता आणि सार्वजनिक सुव्यवस्था यावर परिणाम करणारे कपडे घालण्याची परवानगी दिली जाणार नाही. याच आदेशानंतर अनेक सरकारी शिक्षण संस्थांमध्ये हिजाब घालून वर्गात प्रवेश करण्यावर बंदी घालण्यात आली होती.

### वीडी सतीशन होणार केरळचे नवे मुख्यमंत्री

तिरुवनंतपुरम: केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेस प्रणित संयुक्त लोकशाही आघाडीने मिळवलेल्या दणदणीत विजयानंतर, राज्याच्या मुख्यमंत्रीपदाचा पेच अखेर सुटला आहे. काँग्रेस हायकमांडने ज्येष्ठ नेते आणि विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते वीडी सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ते केरळचे पुढील मुख्यमंत्री असतील. गेल्या १० दिवसांपासून मुख्यमंत्रीपदासाठी सतीशन यांच्यासह के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्निथला यांच्या नावांची जोरदार चर्चा होती. अखेर आमदारांचा पाठिंबा आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर सतीशन यांच्या नावावर अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.वीडी सतीशन हे केरळमधील काँग्रेसचे एक आक्रमक आणि अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी एरनाकुलम जिल्ह्यातील 'परवूर' मतदारसंघातून सलग सहावेळा विजय मिळवला आहे. २०२१ मध्ये जेव्हा केरळमध्ये काँग्रेसचा पराभव झाला होता, तेव्हा त्यांच्याकडे विरोधी पक्षनेतेपदाची धुरा सोपवण्यात आली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१४ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७२.५० क्विंटल | २,१५० | २,६४० | २,३०० |
| ज्वारी/हायब्रिड: ७४.०० क्विंटल | १,९३० | ४,००० | २,६९९ |
| मका/लोकल: २१.५० क्विंटल | १,७०० | १,८०० | १,७५० |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,३५० | ६,३५० | ६,३५० |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ४७.०० क्विंटल | १,६०० | ३,७०० | २,३५९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,०७५ | ५,१०० | ५,०८७ |

# एका बाजुला उन्हाचा चटका, तर दुसऱ्या बाजूला अवकाळीचा फटका

बीड । प्रतिनिधी

**सध्या राज्यातील अनेक भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. तर दुसऱ्या बाजूला राज्याच्या काही भागात अवकाळी पावसानं हजेरी लावल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.मराठवाड्यासह विदर्भात काही ठिकाणी या उन्हाच्या चटक्यात अवकाळीचा फटका दिल्याने फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे बीड जिल्ह्यातही काही तालुक्यात अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.**

राज्यातील काही भागात बुधवारी अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. पाऊस व वादळी वाऱ्यामुळे भात पिकाचे प्रचंड नुकसान झालं आहे. भात पिकासह मका आणि आंब्याच्या बागांना देखील फटका. बसला आहे. तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. गोंदिया जिल्ह्यात काल आलेल्या अवकाळी पाऊस आणि वादळामुळे भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांच्या उन्हाळी भात पिकांचे मोठे नुकसान




झाले आहे. ऐन कापणीला आलेला भात पिक जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडासी आलेला घास हीरावला गेला आहे... कृषी विभागाकडून नजर अंदाजीत अहवालात गोंदिया जिल्ह्यातील १२९ गाव या अवकाळी पावसामुळे बाधित झाली असून जवळपास १३८० हेक्टर कृषी क्षेत्राला याचा फटका बसला आहे. मराठवाड्यातील ▶▶ पान २ वर

# नीट घोटाळ्याचे महाराष्ट्र राजस्थान हरियाणा कनेक्शन

## २१ बँक खात्यांतून पैशांचा महापूर; सीबीआय तपासात धक्कादायक माहिती

पुणे । प्रतिनिधी

**नीट पेपर फुटी प्रकरणातील पुण्यातून ताब्यात घेतलेल्या महिलेची धक्कादायक माहिती समोर समोर आली आहे. नीट परीक्षेच्या प्रक्रियेच्या दरम्यान मनीषा वाघमारे यांच्याकडे तब्बल २१ वेगवेगळ्या बँक खात्यांतून लाखो रुपये जमा, तपासातून माहिती समोर आली आहे. ही रक्कम पेपर विक्रीसाठी किंवा त्यासंबंधित व्यवहारांसाठी आगाऊ म्हणून घेण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. या २१ खात्यांचा मालक कोण आहे आणि हा पैसा नेमका कुठून आला, याचा तपास सीबीआय करत आहे.नीट घोटाळ्याचे महाराष्ट्र राजस्थान हरियाणा कनेक्शन आता समोर येत आहे .**




नगर जिल्ह्यातील धनंजय लोखंडे आणिपुण्याच्या मनीषा वाघमारे यांच्यात अनेक संशयास्पद व्हॉट्सॲप कॉल्स आणि टेलिग्राम मेसेजेस झाल्याची माहिती समोर आली आहे. मनीषा ही विद्यार्थ्यांना हेरून त्यांना मुख्य एजंट लोखंडेपर्यंत पोहोचवण्याचे काम करत असल्याचा संशय व्यक्त होत आहे.नीट.पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील मनीषा वाघमारे यांच्या घरी सकाळी दहा वाजल्यापासून अधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. अहिल्यानगरमधून ताब्यात घेतलेल्या धनंजय लोखंडे याच्यासोबत मनीषा वाघमारे यांचे टेलिग्राम आणि व्हॉट्सअॅपवरील संभाषण तपास यंत्रणेला आढळून आले आहे. तपासादरम्यान वेगवेगळ्या २१ बँक खात्यांमधून मोठ्या प्रमाणात रक्कम ट्रान्सफर झाल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे अधिकाऱ्यांचा संशय अधिक बळावला आहे. संबंधित खात्यांमध्ये नेट परीक्षेच्या काही दिवस आधीच ▶▶ पान २ वर

# ..तर नौकरीत खुल्या जागांवर दावा सांगता येणार नाही

## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

सरकारी नोकरीत आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. आरक्षणाची सवलत घेतलेल्या उमेदवारांना आता खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. तसा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती आहे. केंद्र सरकार आणि गुजरात राज्याप्रमाणे आता महाराष्ट्र सरकारनेही आरक्षणाचं धोरण निश्चित केलं आहे.



वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार आहे. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. मात्र राखीव प्रवर्गातून अर्ज आणि शुल्क भरलं असेल आणि कुठल्याही राखीव प्रवर्गाचा लाभ घेतला नसेल तर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती होईल. या आधी आरक्षणाच्या संबंधित स्पष्ट धोरण नसल्याने हा विषय अनेकवेळा सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्यामुळे राज्य ▶▶ पान २ वर

## जेजुरीचा हळद भंडारा कायद्याच्या चौकटीत येणार



पुणे । प्रतिनिधी

जेजुरी गडकोटातील भक्तांचे श्रद्धास्थान असलेला आणि भंडाऱ्यासाठी प्रसिद्ध असलेला 'हळद भंडारा' आता कायदेशीर चौकटीत येणार आहे. अन्न व औषध प्रशासन लवकरच जेजुरीतील भंडाऱ्यासाठी विशेष धोरण निश्चित करणार आहे, जे पारदर्शकता आणि शुद्धतेला प्राधान्य देईल. भाविकांच्या आरोग्यासाठी या संदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी निर्देश दिले आहेत.

जेजुरी गडकोटावर भंडारा उधळून आग लागल्याची घटना काही काळापूर्वी घडली होती. लोकप्रतिनिधींनी या घटनेबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केले होते. ▶▶ पान २ वर

# विधान परिषदेच्या १० आमदारांनी घेतली शपथ

मुंबई । प्रतिनिधी

विधान परिषदेच्या १० नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी सोहळा आज गुरुवारी झाला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदेंनी नवनिर्वाचित आमदारांना शपथ दिली. यावेळी शिवसेनेच्या (शिंदे गट) नीलम गो–हे यांच्यापासून शपथविधीला सुरुवात झाली. त्यानंतर शिवसेनेचे बच्चू कडू, शिवसेना ठाकरे गटाचे अंबादास दानवे, त्यानंतर भाजपच्या प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवी नाईक, विवेक कोल्हे, संजय भेंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिद्दीकी यांनी परिषदेतील आमदारकीची शपथ घेतली.

विधान परिषदेच्या १० जागांसाठी बिनविरोध निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपचे ५ सदस्य, शिवसेना शिंदे गटाचे २ सदस्य, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रत्येकी एका सदस्याची आमदारपदी नियुक्ती झाली आहे. या सर्व नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी गुरुवारी झाला. यावेळी शिवसेनेच्या नीलम गो–हे यांनी आमदारकीची शपथ घेतली. परंतु, यावेळी त्यांनी शपथेव्यतिरिक्त भाषणही केले. ज्यामध्ये त्या म्हणाल्या की, आज संभाजी महाराजांची जयंती आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मी अभिवादन करते. आमचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानते, असे म्हटले.नीलम गो–हे यांनी आभार मानल्यानंतर यावेळी मुख्य सचिवांनी सूचना करत नवनिर्वाचित सदस्यांना शपथेचा नमुना दिला. त्यामुळे त्यांनी शपथेपूर्वी किंवा शपथेनंतर कोणत्याही नावाचा किंवा घोषणेचा उल्लेख करू नये, अशी विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांचे नाव शपथ घेण्याकरिता पुकारण्यात आले. बच्चू कडू यांनीही यावेळी शपथ घेतली. ▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादीचा आनंद शिवसेनेत जाण्याची तयारी

ठाणे । प्रतिनिधी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांचा राजकीय वारसा पुढे नेण्याचं काम सुनेत्राताई यांच्याकडून सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत वेगळंच राजकारण सुरू असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस आणि ठाणे समन्वयक आनंद परांजपे यांनी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून त्यांनी आपला राजीनामा कळवला. ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरु आहे



आनंद परांजपे यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला हा दुसरा धक्का बसला आहे. प्रवक्ता, ठाणे समन्वयक आणि महाराष्ट्र सरचिटणीस पदासोबतच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वचा देखील त्यांनी राजीनामा दिला आहे. ''मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सरचिटणीस ▶▶ पान २ वर

# खरात प्रकरण भोवले उपजिल्हाधिकारी निलंबित

मुंबई । प्रतिनिधी

**अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आल्याचं दिसतंय. अशोक खरात सोबत आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप असलेल्या उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे याचे निलंबन करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिजित भांडेच्या निलंबनाचे आदेश दिल्याची माहिती आहे.**

उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अभिजीत भांडे याला अशोक खरात प्रकरण चांगलंच भोवल्याचं चित्र आहे. अशोक खरातसोबत असलेले आर्थिक व्यवहार त्याच्या अंगलट आले आहे. अशोक खरात याच्यासोबतच अभिजित भांडे याचे कॉल रेकॉर्डस हाती आल्यानंतर महसूलमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.भोंदू अशोक खरात आणि उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्यामध्ये तब्बल १४३ वेळा फोन कॉल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा कॉल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा कॉल केले आहेत.याच पुराव्याच्या आधारे आता अभिजीत भांडे याच्या निलंबनाचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिल्याची माहिती ▶▶ पान २ वर

# देवभाऊ अन शेलार मामाची बुलेटवरून विधान भवनात इंट्री

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनानंतर राज्यातील सत्ताधारी नेत्यांकडूनही त्याची अंमलबजावणी सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज स्वत: बाईक चालवत विधान भवनात दाखल झाले.त्यांच्या मागे बसले होते ते मंत्री आशिष शेलार त्यांच्या बुलेट इंट्री नंतर विरोधकांनी यावरही काही टिपण्या केल्या .मात्र, दुसरीकडे मंत्री गिरीश महाजन आणि रवींद्र चव्हाण यांनी विमानातून प्रवास केला. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी टीका केली



आहे. राज्यातील अनेक मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ▶▶ पान २ वर

## नीट पेपरफुटी;लातूरमध्ये निवृत्त प्राध्यापक ताब्यात!

लातूर । प्रतिनिधी

**नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात लातूरमधील एका निवृत्त प्राध्यापकाला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित प्राध्यापकाची कसून चौकशी सुरू असून या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तर काही खाजगी क्लासेस चालक देखील सीबीआय च्या रडारवर आहेत .**

मिळालेल्या माहितीनुसार, नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयचे अधिकारी मागील काही दिवसांपासून विविध राज्यांमध्ये तपास मोहीम राबवत आहेत. त्याच अनुषंगाने लातूरमध्येही पुन्हा ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रासह १६ राज्यात २० जूनपासून एसआयआर

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भारत निवडणूक आयोगानं एसआयआरचा तिसरा टप्पा जारी केला आहे. या तिसऱ्या टप्प्यात १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा देखील समावेश आहे. महाराष्ट्रात एसआयआरची प्रक्रिया २० जूनपासून सुरु होईल ती प्रक्रिया ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर पूर्ण होणार आहे.एसआयआरचा तिसरा टप्पा २० मे पासून सुरु होईल आणि तिसरा टप्पा २३ डिसेंबरला २०२६ ला संपणार आहे.**

आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये एसआयआर होणार आहे. नवी दिल्ली, चंदीगड आणि दादरा नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगानं

### महाराष्ट्र आकडेवारी

**बीएलओची संख्या : ९७९२४**

**बीएलएची संख्या : ९६९४९**

**मतदार संख्या : ९,८६,६४,४१३**

एसआयआर प्रक्रिया मतदार यादी अचूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्यात ३.९४ लाख बूथ लेव्हल ऑफिसर्स घरोघरी भेटी देऊन ३६.७३ कोटी मतदारांची माहिती घेतील. यासाठी त्यांना मदत करण्यासाठी ३.४२ लाख बूथ लेव्हल एजंट मदत करतील, ज्यांची नियुक्ती राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगानं यासाठी सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक बूथसाठी बीएलएची नियुक्ती करण्याचं आवाहन केलं आहे. भारत निवडणूक आयोगानं यापूर्वी दोन टप्प्यात १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली आहे. ज्यात ५९ कोटी मतदारांचा समावेश होता. त्यामध्ये ६.३ लाख ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मी रबरी शिक्का नाही

भारतीय लोकशाहीचे सौंदर्य तिच्या 'चेक अँड बॅलन्स' व्यवस्थेत दडलेले आहे. संसद, न्यायपालिका, कार्यपालिका आणि माध्यम हे या लोकशाहीचे चार मुख्य आधारस्तंभ मानले जातात. मात्र, गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहता, या स्तंभांची आणि इतर स्वायत्त संस्थांची स्वायत्तता धोक्यात आल्याची ओरड सातत्याने होत आहे. दोन दिवसापूर्वी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधीनी प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात हि ओळ सगळ्यात महत्वाची आहे.ती म्हणजे मी रबरी शिक्का नाही.

हे नेमक काय आहे हे समजून घेण्यासाठी आपली राज्यघटना माहिती असायला हवी आणि इथल्या संसदीय लोकशाहीच नेमक मॉडल कस आहे हेही माहिती असायला हव. आपल्या लोकशाहीची सगळ्यात महत्वाची व्यवस्था म्हणजे चेक अँड बॅलन्स व्यवस्था संसद सर्वोच्च असली तरी संसदेने केलेले कायदे घटनेच्या मुलभूत तत्वांशी सुसंगत आहे का हे पाहण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची. राष्ट्रपतीची आहे ते घटनात्मक प्रमुख आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महाभियोग चालवू शकतात त्यामुळे अनिबंध सत्ता कुणाकडे नाही. हे जास्तीत जास्त चांगल मॉडेल बनवलेलं असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला ईशारा सगळ्यात महत्वाचा होता. घटना कितीही चांगली आणि आदर्श बनवण्याचा आपण प्रयत्न केला तरी तिची अंमलबजावणी करणारी माणस आणि त्यांची नैतिकता यावर घटनेचे यशापयश आणि खरखुर लोकांच राज्य अवलंबून आहे.

नेमक है आपण मागची दहा अकरा वर्षे सातत्याने पाहत आहोत. संसद न्यायपालिका, कार्यपालिका आणि माध्यम हे लोकशाहीचे चार खांब समजले जातात आता देश चालवण्यासाठी अनेक स्वायत संस्था उदा. निवडणूक आयोग आहेत. तशाच वेगवेगळ्या तपास यंत्रणा, रिझव्हे बैंक इत्यादी संस्था आहेत. या सगळ्या संस्थाची स्वायत्तता मोडीत काढलेली आहे. माध्यम सरकारच्या जाहिरात एजन्सी झालेल्या आहेत.मागिल दहा वर्षे योगायोगाने जिथे जिथे म्हणून विरोधकांची सरकार आहेत तिथ तिथ तपास यंत्रणा मग त्या ईडी असो कि सीबीआय, त्यांच्या धाडी पडतात, राजकीय नेत्यांच्या करीयरची धूळधाण होते. जे झुकायला तयार होत नाहीत त्यांना जेलमध्ये जायला लागत आणि जे जुळवून घेतात त्यांना सतेत वाटा मिळतो. हा तपास यंत्रणांचा दुरुपयोग नव्हे काय ?सीबीआय आणि ईडी च्या गैरवापराचा जो आरोप राहुल गांधीनी आपल्या पत्रामध्ये केलेला आहे त्या संबंधी आकडेवारी २१ सप्टेंबर २०२२ च्या लोकसतामध्ये आलेली आहे. या बातमीनुसार कॉंग्रेस आघाडी सरकारच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात ७२ राजकीय नेत्यांवर सीबीआयने कारवाई केली त्यापैकी (८० टक्के) विरोधी पक्षाचे होते, म्हणजेच उरलेले ४० टक्के सताधारी पक्षाचे असूनही त्यांच्यावर कारवाई झाली.

२०१४ पासून राजकीय नेत्यांवर कारवाई झाली पैकी १९८ विरोधी पक्षांचे अर्थात बिगरभाजप आहेत, विरोधी पक्षांवर कारवाई होण्याची टक्केवारी आहे ९५ टक्के, इंडियन एक्स्प्रेसच्या माहितीनुसार यासंबंधी सीबीआय अधिकाऱ्यांना प्रश्नावली दिल्यावर त्यांनी आकडेवारीच्या योगायोग नेमका कसा झाला याबद्दल काहीही सांगितल नाही.जे सीबीआय बाबत तेच ईडी बाबत मागच्या साडेसात वर्षात ईडी ने मारलेले उपपे १७००. तपास केला प्रकरणांचा आणि गुन्हे सिद्ध किती झाले ? तर फक्त ९ म्हणजे १७०० पैकी १ म्हणजे टक्केवारी पाहिली ०.५२ टक्के, ज्या प्रकरणाचा तपासच केला नाही त्याची आकडेवारी आहे या अडकलेल्या लोकांची अबू गेलीच ?या तपास यंत्रणा प्रमुखांची निवड असो किंवा निवडणूक आयुक्तांची निवड असो, जी प्रक्रिया कायदेशीर आहे तिच्यातून पळवाट काढून आपल्या सोयीची माणसे तिथ बसवून जर विरोधकांचे पक्ष किंवा नेते पळवणे यासारखे प्रकार होणार असतील तर त्याना लोकशाही कस म्हणायचं आपण ?लोकपालाची नेमणूक विरोधी पक्षनेता असलेली समिती करते आणि लोकसभेत संख्याबळ नाही या नावाखाली मुद्?दाम विरोधी पक्षनेतेपद कुणाला दिलेले नव्हते त्यामुळे लोकपाल नेमणूक रखड़ली. आठवत असेल तर २०23 च्या डिसेंबर मध्ये असलेल्या संसद अधिवेशनात गोधळाचा आरोप करून घाऊकपणे जवळपास दीडशे विरोधी खासदारांचे निलंबन करण्यात आले आणि त्या नंतर आवाजी मतदानाने अनेक कायदे मंजूर केले गेले त्यामधील एक कायदा निवडणूक आयुक्त नेमणुकीचा होता. पूर्वी या निवड समितीमध्ये सरन्यायाधीश, प्रधानमंत्री आणि विरोधी पक्षनेता होता. त्यामधून नवीन कायद्?याने सरन्यायाधीस काढून टाकून मंत्री घेतले. परिणामी सरकारचे बहुमत झाले. याच बहुमताने सध्याचे निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार आलेले आहेत आणि त्यांच्यावर राहुल गांधीनी पत्रकार परिषदेत केलेले आरोप सर्वांना माहीत आहेत. सीबीआयच्या प्रमुखांच्या निवड प्रक्रीयेमध्ये विरोधी पक्षनेत्याचा सहभाग असतो. त्यामुळे सीबीआय प्रमुखपदी अधिकारी नेमताना सेवाज्येष्ठता अनुभव, कामगिरी, कौशल्य या सगळ्याच बाबी गृहीत धराव्या लागतात. अश्या संभाव्य उमेदवारांची यादी राहुल गांधीनी वांरवार मागणी करूनही दिली गेली नाही ऐनवेळी जेव्हा निवड प्रक्रिया सुरु झालेली असताना समिती सदस्यांना जर तुम्ही माहिती देणार असाल अभ्यास करणे अशक्य आहे. हाच मुद्दा राहुल गांधीनी मांडलेला आहे. तर तपास यंत्रणाच दुरुपयोग करण्याच्या उद्देशाने आपल्याला हवा तोच अधिकारी प्रमुखपदी बसवण्याचा अट्टाहास कशाला तुमची लोकशाही आणि संसदेवर असणारी श्रद्धा आणि निष्ठा किती बेगडी आहे हेच सिद्ध करते. तपास यंत्रणांचा गैरवापर करून पुन्हा आणखी पक्ष फोडू नयेत किंवा विरोधी पक्षातून सताधारी पक्षात पळवून नेऊ नयेत याच साठी राहुल गांधीनी या निवड प्रक्रियेला आक्षेप नोंदवला आहे आणि आपण रबरी शिक्का होणार नाही अस ठामपणे सांगितलेलं आहे.

# एसीचा गारवा; त्वचा कोरडी, श्वसनविकारांचाही धोका!- डॉ.रोहन मालुरे

## एसीचे तापमान २४ ते २६ अंश ठेवा,एसीतून थेट बाहेर उन्हात जाणे टाळा

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या उन्हामुळे लाहीलाही होत असताना थंडाव्यासाठी एसीचा वापर घराघरांत वाढला आहे. मात्र, दिवसभर एसीच्या कृत्रिम गारव्यात राहणे आरोग्यासाठी महाग ठरू शकते. एसीमुळे केवळ त्वचेचेच नव्हे, तर श्वसन आणि सांध्यांचे गंभीर विकार जडण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.



राज्यात उन्हाचा कडाका वाढला असून अनेक शहरांचे तापमान ४१ अंशांच्या पुढे गेले आहे. बाहेरची ही प्रचंड उष्णता सोसवत नसल्याने नागरिक कार्यालये आणि घरांमध्ये २४ तास एसीचा आधार घेत आहेत. हीच एसी अनेकांच्या आरोग्यावर परिणाम करत असल्याचे मत तज्ज्ञांचे आहे.

**सांधे आणि स्नायुदुखी** : खूप कमी तापमानात बसल्याने सांध्यांमधील वंगण कमी होऊन सांधे कडक होतात. यामुळे सांधेदुखी, कंबरदुखी आणि स्नायू आखडण्याच्या तक्रारी वाढतात. विशेषतः संधिवात असलेल्या लोकांसाठी एसीचा अतिवापर वेदनादायी ठरतो.

**फिल्टरमध्ये धूळ साचल्यास संसर्गाची भीती:** एसीचे फिल्टर वेळेवर स्वच्छ न केल्यास त्यात धूळ, बुरशी आणि जिवाण साचतात, एसी सुरू केल्यावर हे कण हवेत पसरतात आणि श्वसनामार्गाद्वारे शरीरात शिरून गंभीर संसर्ग होतो. एसीमधील कोरडी हवा फुफ्फुसांतील ओलावा कमी करते व सतत गारव्यामुळे श्वसनाचे विकार, ॲलर्जी, नाक चोंदणे, घसा कोरडा पडणे आणि सर्दी-खोकल्याचा त्रास होतो. अस्थमा किंवा ॲलर्जी असलेल्या रुग्णांसाठी हा गारवा ''ट्रिगर'' ठरून दम्याचा त्रास वाढवू शकतो.

**त्वचा कोरडी, केस निस्तेज** : एसी हवेतील आर्द्रता शोषून घेत असल्याने त्वचेतील नैसर्गिक तेल कमी होते. परिणामी त्वचा कोरडी पडून खाज सुटते. याचा परिणाम केसांवरही होतो; केस कोरडे, निस्तेज आणि लवचिकता गमावलेले दिसू लागतात.

**डोकेदुखी आणि थकवा:** एसीच्या बंद खोलीत शुद्ध हवेचा अभाव असतो. दीर्घकाळ एकाच हवेत राहिल्याने ऑक्सिजनची पातळी किंचित कमी होऊ शकते, ज्यामुळे सतत डोकेदुखी, चक्कर येणे आणि काम करताना लवकर थकवा जाणवतो.

**एसीच्या अतिवापराचा आरोग्याला धोका:** एसी नैसर्गिक ओलावा शोषून घेतो. दीर्घकाळ थंड वातावरणात राहिल्याने शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली विस्कळीत होते. रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होऊन किरकोळ हवामान बदलानेही व्यक्ती आजारी पडते.

**काय काळजी घ्यावी?:** एसीचे तापमान २४ ते २६ अंशांच्या दरम्यान ठेवावे. एसी सुरू असताना खोलीत एका भांड्यात पाणी ठेवावे, जेणेकरून आर्द्रता टिकून राहील. एसीतून थेट बाहेर उन्हात जाणे टाळावे, नियमित पाणी पिऊन शरीर हायड्रेटेड ठेवावे. दर महिन्याला एसीचे फिल्टर स्वच्छ करावेत. श्वसनाचा त्रास टाळण्यासाठी नैसर्गिक हवा खेळती ठेवणे, एसीचा खूप कमी तापमानावर मर्यादित वापर गरजेचा आहे. असे मत डॉ. रोहन मालुरे, (एम.बी.बी.एस.एम.डी.मेडीसीन) विठाई हॉस्पिटल, आठवडी बाजार रोड, गांधी चौक, गांधीनगर, कळंब मो.९८६०५६०५५७

# लोणगाव येथे वादळी वाऱ्यामुळे विहिरीवरील सोलार पंपाचे मोठे नुकसान

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेल्या सोलार पंपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार कचरू एकनाथ सोनकांबळे, रा. लोणगाव ता. माजलगाव जि. बीड यांच्या मालकीची मौजे लोणगाव येथील गट क्रमांक ९६ मधील शेती आहे. या शेतातील विहिरीवर सि.आय.आर.कंपनीचा सोलार पंप बसविण्यात आला होता.दिनांक १३ मे २०२६ रोजी परिसरात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे सोलार पाट्या व सोलार प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की सोलार यंत्रणेच्या अनेक प्लेट उखडून पडल्या तसेच संपूर्ण यंत्रणा विस्कळीत झाली. त्यामुळे शेतातील पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली असून आगामी पिकांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून नुकसानग्रस्त शेतकऱ्याने प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शासनामार्फत आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. स्थानिक शेतकऱ्यांकडूनही नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची दखल घेऊन प्रशासनाने मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट अनिवार्य

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी तसेच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे.**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी.' वाहन मालकांनी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी आगाऊ वेळ निश्चित करावी. संबंधित वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सरनाईक पुढे म्हणाले की, ''ज्या वाहनधारकांनी मुदतीत बसवून घेतले नाही किंवा अपॉईंटमेंट नोंदवली नाही, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर विशेष तपासणी मोहीम राबवून पडताळणी करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणा-यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल तसेच १ हजार रुपयांपर्यंत तडजोड शुल्क आकारण्यात येईल.

# साखर निर्यात बंदीमुळे ऊस उत्पादकांमध्ये संताप

## किसान सभेची केंद्रावर टीका; ''निर्णय तातडीने मागे घ्या'', शेतकरी व साखर उद्योग संकटात जाण्याची भीती

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशभरातील साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये केंद्र सरकारच्या साखर निर्यात बंदीच्या निर्णयामुळे तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. केंद्राने साखर निर्यातीवरील ''नियंत्रित'' हा शब्द हटवून ''प्रतिबंधित'' असा निर्णय लागू करत संपूर्ण निर्यात बंदी जाहीर केली आहे. या निर्णयाचा फटका थेट ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखाने आणि संपूर्ण साखर उद्योगाला बसणार असल्याचा आरोप अखिल भारतीय किसान सभेने केला आहे.

किसान सभेने या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत केंद्र सरकारने तातडीने बंदी मागे घ्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, साखरेचे किमान विक्री मूल्य अनेक वर्षांपासून वाढवण्यात आलेले नाही, तर दुसरीकडे उत्पादन आणि प्रक्रिया खर्च सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे अनेक साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले असून, ऊस उत्पादकांना एफआरपीची रक्कम वेळेवर देणेही कठीण होण्याची शक्यता आहे. किसान सभेने म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय स्तरावर इंधन संकट आणि भूराजकीय परिस्थितीमुळे अनेक देश साखर उत्पादनाऐवजी इथेनॉल निर्मितीकडे वळत आहेत. त्यामुळे भारतीय साखरेसाठी जागतिक बाजारपेठेत मोठी संधी निर्माण झाली होती. अशा वेळी निर्यात वाढवून उद्योगाला चालना देणे अपेक्षित असताना केंद्राने निर्यात बंदी लागू करून उद्योगासमोरील अडचणी अधिक वाढवल्या आहेत. संघटनेच्या मते, देशात साखरेची कोणतीही टंचाई नाही. नुकत्याच पार पडलेल्या गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात साखर उत्पादन झाले असून महाराष्ट्राने उत्पादनात आघाडी घेतली आहे. मागील वर्षाचा साखर साठाही उपलब्ध आहे. यंदा ऊस लागवडही समाधानकारक झाल्याने पुढील हंगामात उत्पादन चांगले राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अतिरिक्त उत्पादन आणि उपलब्ध जागतिक बाजारपेठ लक्षात घेता निर्यात वाढवणे गरजेचे होते, असे किसान सभेचे मत आहे. मात्र, निर्यात बंदीमुळे साखर कारखान्यांच्या उत्पन्नावर परिणाम होऊन त्याचा थेट फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. किसान सभेने केंद्र सरकारकडे साखर निर्यात बंदी तातडीने उठवणे, साखरेच्या किमान विक्री मूल्यात वाढ करणे, इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देणे आणि नवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठा शोधण्यासाठी निर्यात केंद्री धोरण राबवण्याच्या मागण्या केल्या आहेत. या निवेदनावर डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावित, डॉ. अजित नवले आणि उमेश देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या असून, शेतकरी हितासाठी केंद्राने निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी किसान सभेने केली आहे.

## पान १ वरून...

### एका बाजुला उन्हाचा चटका, तर दुसऱ्या

हिंगोली शहरासह अनेक भागांमध्ये आज अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे अवकाळी पावसाचा फटका हिंगोलीत हळद उत्पादक शेतकऱ्यांना बसला असून हळद मार्केटमध्ये शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेली शेकडो क्विंटल हळद भिजली आहे, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निष्काळजीपणामुळे लिलावा पूर्वीच हिंगोलीत शेतकऱ्यांची हळद अवकाळी पावसामुळे भिजली आहे.. बाजार समितीमध्ये बाजार समितीच्या नियोजन शून्य कारभारामुळे बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या वाहनांच्या रांगा लागल्या आहेत यामुळे शेतकऱ्यांची हिंगोलीत हळद भिजली आहे.दिवसभर उन्ह तापल्यानंतर दुपारनंतर पुन्हा पावसाचे वातावरण तयार होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ढगांनी गर्दी करत मेघगर्जनेसह वादळी पावसाला सुरुवात झाली.वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे पडल्याने व विद्युत तारा तुटल्याने रात्री उशिरापर्यंत अनेक भागातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता.बीड जिल्ह्यातील आष्टी पाटोदा अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील काही भागात वादळी वाऱ्यांनी अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली विजेचे खांब उन्मळून पडली आंब्याच्या बागांचे तर मोठया प्रमाणात नुकसान झाले एका बाजुला उन्हाचा चटका, तर दुसऱ्या बाजूला अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे .

----------

### ..तर नौकरीत खुल्या जागांवर

सरकारने केंद्राच्या आणि गुजरातच्या धर्तीवर असा निर्णय घेतल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण धोरण हे उभे आरक्षणआणि आडवे आरक्षण अशा दोन स्तरांवर लागू होते. २०२४ मध्ये मराठा समाजासाठी स्वतंत्र प्रवर्गांतर्गत १०% आरक्षणाचा कायदा करण्यात आला असून, त्यानुसार राज्यातील एकूण उभे आरक्षण वाढले आहे. काही भरती प्रक्रियांमध्ये जिल्हानिहाय किंवा न्यायालयीन आदेशांनुसार अंमलबजावणीत बदल असू शकतात, त्यामुळे अंतिम आकडे संबंधित जाहिरात आणि शासन निर्णयानुसार तपासणे आवश्यक असते.

-----------

### नीट घोटाळ्याचे महाराष्ट्र

पैसे जमा झाल्याने या व्यवहारांमध्ये ॲडव्हान्स रक्कम घेतल्याची शक्यता तपासली जात आहे. दरम्यान, ॲडमिशन कन्सल्टन्सीच्या माध्यमातून धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे यांची ओळख झाल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.यापूर्वी याच प्रकरणात पुण्यातील फुरसुंगी येथून सायबर सुरक्षा इंजिनिअरिंगचा विद्यार्थी शेषराव सोळंकी आणि बिबवेवाडीतील ब्युटी पार्लर चालक मनिषा वाघमारे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच नाशिकमधून शुभम खैरनार यालाही अटक करण्यात आली आहे. धनंजय लोखंडे हा स्वतः पुण्याच्या वाघोली परिसरात राहून एजंट्समार्फत प्रश्नपत्रिका विकण्याचे रॅकेट चालवत होता. या रॅकेटमध्ये आता ओंकार शिंगोटेचे नाव समोर आल्याने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाच या घोटाळ्यात मोठा सहभाग असल्याचे पाहायला मिळत आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेण्यात आलेल्या या परीक्षेची प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले आहे. राजस्थान, हरियाणा आणि महाराष्ट्र अशा तीन राज्यांमध्ये या घोटाळ्याचे धागेदोरे पसरले आहेत. कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिकांची देवाणघेवाण करून लाखो रुपयांचे व्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. ओंकार शिंगोटेच्या चौकशीतून या रॅकेटमधील इतर आर्थिक व्यवहार आणि नवीन एजंट्सची नावे समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

---------

### राष्ट्रवादीचा आनंद

तथा प्रवक्ता महाराष्ट्र प्रदेश, समन्वयक ठाणे व पालघर (जिल्हा) व पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. तरी माझा राजीनामा आपण स्विकारावा ही नम्र विनंती'', अशा ४ ओळीच्या आशयात आनंद परांजपे यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे, आनंद परांजपे आता कुठल्या पक्षात जाणार याची चर्चा राजकीय वर्तुळात होत असून ते शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेणार असल्याचे समजते. नुकतेच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादीत मोठी चढाओढ लागली होती. त्यामध्ये, अखेर झिशान सिद्दीकी यांना राष्ट्रवादीने विधानपरिषदेची आमदरकी दिली. त्यामुळे, आनंद परांजपे हे नाराज असल्याची चर्च होती, आनंद परांजपे हे शिवसेनेत जाणार अशी चर्चा आहे, त्यांनी गेल्या काही दिवसात २ वेळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट देखील घेतली आहे. त्यामुळे, ते पुन्हा शिवसेनावापसी करतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.

---------

### विधान परिषदेच्या १० आमदारांनी

मात्र, त्यांनी मला थोडी सुविधा दिली पाहिजे, असे म्हणत भाषण करण्याची संधी देण्यात यावी, अशी विनंती केली. मात्र, त्यांच्या या मागणीवर तत्काळ विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी 'नाही.. असे म्हणत मुख्य सचिवांकडून शपथेव्यतिरिक्त काहीही न बोलण्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळाले.

---------

### जेजुरीचा हळद भंडारा

त्यानंतर भंडाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी आणि पारदर्शकतेसाठी विशेष धोरण ठरविण्याची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आमदार विक्रम पाचपुते, आमदार महेश शिंदे, आमदार राजू नवघरे, तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव धीरजकुमार, आयुक्त श्रीधर डुबे पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते.विविध देवस्थानांच्या ठिकाणी विकला जाणारा 'हळद भंडारा' शुद्ध हळदीच्या स्वरूपातच उपलब्ध असावा, तसेच विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार अन्न परवाना घेऊनच विक्री करावी, असे स्पष्ट निर्देश स्थानिक प्रशासनाला दिले जात आहेत. यामुळे भेसळयुक्त 'हळद भंडारा' विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होणार आहे.मंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी नगरपरिषद आणि आरोग्य विभागाने तीन महत्त्वाच्या उपाययोजना करण्याचे ठरवले आहे. सुरक्षितता उपाययोजना, जनजागृती आणि आरोग्य मोहीम अशा तीन महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.कायदेशीर दृष्टिकोनातून भंडाऱ्याचे वर्गीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. सामान्यतः ' भंडारा'' म्हणजे मोफत अन्न वितरण, परंतु जेजुरीत तो 'हळद भंडारा' या स्वरूपात पूजेसाठी वापरला जातो. जर हळदीचा वापर सौंदर्यवाढ किंवा उपचारासाठी केला जात असेल, तर तो औषध किंवा सौंदर्यप्रसाधन यामध्ये येतो, परंतु जेजुरीतला हळद भंडारा' 'धार्मिक विधी' आणि 'प्रसाद' म्हणून वापरला जातो. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन त्याचे विशेष नियमन करणार आहे. या निर्णयामुळे जेजुरीतील भंडाऱ्याला कायदेशीर ओळख मिळणार असून, देवस्थानांच्या ठिकाणी भेसळ रोखण्यासाठी हा एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.

-----------

### देवभाऊ अन शेलार मामाची

कमी करण्यात आली असून, सरकारी यंत्रणांकडूनही खर्च नियंत्रणावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वत: पुढाकार घेत बाईकचा वापर केल्याने प्रशासन आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्यांनाही एक वेगळा संदेश दिला गेल्याची चर्चा सुरू आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर तसेच पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सार्वजनिक वाहतूक आणि कमी इंधन वापराच्या पर्यायांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:पासून बदलाची सुरुवात केली असून, शासकीय खर्च कमी करणे, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षण यावर सरकारने भर दिला आहे. या नव्या निर्णयांमुळे मंत्र्यांचे ताफे, दौरे, प्रवास पद्धती आणि सरकारी कार्यालयांच्या कामकाजात मोठे बदल होणार आहेत. सरकारच्या नव्या आदेशानुसार मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. परगावी होणा-या दौ-यांदरम्यान निश्चित मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरली जाणार नाहीत, अशी स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे.मंत्री आणि वरिष्ठ अधिका-यांचे प्रस्तावित परदेश दौरे रद्द करण्यात आले असून, पुढील काही महिन्यांत नव्या दौ-यांना मंजुरी दिली जाणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. विशेष विमान किंवा हेलिकॉप्टरचा वापर टाळून नियमित विमानसेवेचा वापर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. याशिवाय, आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे मंत्री आणि वरिष्ठ अधिका-यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

------------

### खरात प्रकरण भोवले

आहे. त्यामुळे रुपाली चाकणकरांच्या नंतर आता अभिजीत भांडेची देखील चौकशी केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अभिजीत भांडे हा उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत होता. अशोक खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याप्रकरणी आता त्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अशोक खरातशी संबंधित अनेक कामांमध्ये अभिजीत भांडेची गुंतवणूक असल्याचा आरोप केला जात आहे. आता त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईनंतर खरातशी संबंधित इतर महसूल अधिकाऱ्यांचेही धाबे दणाणल्याची चर्चा आहे.

-------------

### महाराष्ट्रासह १६ राज्यात २०

बीएलओ आणि ९.२ लाख बीएलएंचा समावेश होता. महाराष्ट्रातील वेळापत्रक -एसआयआरसाठी पात्रतेची तारीख : १ ऑक्टोबर २०२६,एसआयआर तयारी, प्रशिक्षण : २० जून ते २९ जून २०२६.बीएलओ मार्फत घरभेटी : ३० जून ते २९ जुलै २०२६,मतदान केंद्रांचं सुसुत्रीकरण : २९ जुलै २०२६ .मसूदा मतदार यादीची छपाई : ५ ऑगस्ट २०२६ .दावे आणि आक्षेप यासाठी मुदत :५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६.दावे आणि आक्षेपांचा निपटारा : ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६,अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे : ७ ऑक्टोबर २०२६.दरम्यान, भारत निवडणूक आयोगाकडून एसआयआरची घोषणा होण्यापूर्वीच महाराष्ट्रात बऱ्यापैकी पूर्वतयारी करण्यात आली आहे. याचा फायदा प्रत्यक्ष एसआयआरच्या कामांदरम्यान होणार आहे.

-------

### नीट पेपरफुटी;लातूरमध्ये

तपासाची चक्रे फिरू लागली आहेत. सीबीआयच्या पथकाने स्थानिक पातळीवर काही व्यक्तींशी संपर्क साधत माहिती गोळा करण्यास सुरुवात केली असून निवृत्त प्राध्यापकाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.जुलै २०२४ मध्येही नीट पेपरफुटी प्रकरणामुळे लातूरचे नाव चर्चेत आले होते. त्या वेळी काही कोचिंग क्लासेस, परीक्षा व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्ती आणि विद्यार्थ्यांच्या संपर्कातील लोकांची चौकशी करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा सीबीआयची टीम लातूरमध्ये दाखल झाल्याने या प्रकरणाचे धागेदोरे अधिक खोलवर जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे.लातूर मधील काही नामांकित क्लासेस चालकावर सीबीआय बारीक नजर ठेऊन आहे त्यांची देखील गोपनीय माहिती काढण्यात येत असल्याचे समजते.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. १५ मे २०२६



## थोडक्यात

### पत्रकार हरिदास तावरे यांना पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही पद्म पाणी संस्थेचे पुरस्कार अनेक मान्यवरांना जाहीर त्यामध्ये लोकशाही मराठीचे बीड जिल्हा प्रतिनिधी हरिदास तावरे यांना या वर्षीचा राज्य राष्ट्रीय नावलौकिक पुरस्कार जाहीर झाला असून गेली १० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात जिद्द चिकाटी आणि मेहनत तसेच सामाजिक, राजकीय व शेतकऱ्यांसाठी,



ऊसतोड मजुरांसाठी सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नावर बीड जिल्ह्यातील कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जीव ओतून काम करणारे म्हणून हरिदास तावरे यांची ओळख आहे याच कामाची दखल घेत पद्म पाणी या संस्थेने हरिदास तावरे यांना हा पुरस्कार जाहीर केला आहे पुरस्काराचे वितरण १७ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी व इतर मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आहे.

### गोपाल सोमानी यांचे दुःखद निधन

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील प्रसिद्ध कॉन्ट्रैक्टर गोपाल सोमानी यांचे दुःखद निधन दी. १३ रोजी झाले असून अंतविधि दी.१४ वार गुरूवरी



राजस्थानी स्मशान भूमि येथे सकाळी ९ वाजता करण्यात येणार असून त्यांच्या पच्यात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी नातवंडे असा मोठा परिवार आहे. सोमानी परिवार सतत लोकांच्या सूखा दुःखात धावुनी येणारे असून त्यांनी परळी सारख्या छोट्या गावात पंडित मिश्रा यांची शिव महापुराज कथा केली त्यांचा मुलगा तेजस सोमानी यांनी गत ३ वर्ष राजस्थानी गणेश मंडल मोठ्या हर्षोल्लास मधे साजरा केला काही महिन्या पूर्वी त्यांनी परळी मधे खाटू शाम बाबा ची कथा ही केली असे सामाजिक कार्यक्रम घेणारे आज कालवश झाले गोपाल सोमानी यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र शोककळा परसली असून सोमानी परिवारच्या दुःखात दै . राज्य लोकतंत्र पारिवार सहभागी आहे

### जिल्हास्तरीय नियामक परिषदेची बैठक

बीड । प्रतिनिधी

केंद्र पुरस्कृत ULL-S नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय नियामक परिषदेची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली. बैठकीस समिती सदस्य, संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या ULL-S नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. असाक्षर नागरिकांना साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ग्रामस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

कार्यक्रमांतर्गत स्वयंसेवकांची नोंदणी, सर्वेक्षण, अध्ययन केंद्रांची कार्यवाही, मूलभूत साक्षरता व जीवन कौशल्य प्रशिक्षण याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच गाव,शहर, शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून तसेच डायटच्या सहकार्याने जनजागृती वाढवून जास्तीत जास्त लाभार्थी सहभागी करून घेण्यावर भर देण्यात आला. सन २०२६-२७ मध्ये मा.शिक्षण संचालक (योजना ) म.रा.पुणे यांनी बीड जिल्हयाला ३७३२४ उदिष्ट निर्धारित करुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार तालुक्यांना पुढील प्रमाणे उदिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे. अंबाजोगाई-३४१९, आष्टी-३५२३, बीड-६२८४, धारुर-१९१९, गेवराई-५४०२, केज-३४८५, माजलगांव-३९५०, परळी-३९९८, पाटोदा-१९०९, शिरुर कासार-२००५, वडवणी -१४२९ असे एकूण ३७३२४ चे उदिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. सर्व विभागातील शासकीय यंत्रणेचा सहभाग घेऊन व तसेच ग्रामपातळीवरील सर्व सर्वसंबंधिताचा सहभाग घेऊन उदिष्ट साध्य करण्याचा निर्धार केला.

# अवकाळी पावसाचा तडाखा : करेवडगावातील खांडवे कुटुंब बेघर, आ.धसांनी दिला तातडीच्या मदतीचा शब्द

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव येथे बुधवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस आणि सुसाट वाऱ्याने शेतकरी व ग्रामस्थांचे मोठे नुकसान केले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे गावात एकच धावपळ उडाली. अनेक ठिकाणी झाडे कोसळली, तर काही घरांचे नुकसान झाले. यामध्ये खांडवे कुटुंबाच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने त्यांचा संपूर्ण संसार अक्षरशः उघड्यावर आला आहे.

खांडवे वस्तीवरील घराचे छप्पर वादळी वाऱ्यामुळे क्षणार्धात उडून गेले. घरातील कपडे, धान्य, संसारोपयोगी साहित्य, भांडीकुंडी तसेच उन्हाळ्यासाठी महिलांनी कष्टाने तयार केलेल्या कुरडया, पापड आणि इतर खाद्यपदार्थ पावसाच्या पाण्यात भिजून खराब झाले. अनेक वर्षांच्या कष्टाने उभा केलेला संसार डोळ्यांसमोर उद्ध्वस्त झाल्याने खांडवे





कुटुंबातील महिलांना अश्रू अनावर झाले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना कुटुंबातील महिलांनी भावनिक शब्दांत सांगितले की, एका क्षणात सर्व काही उद्ध्वस्त झाले. घर नाही, छप्पर नाही, संसाराचे साहित्य खराब झाले. शासनाने तातडीने आर्थिक मदत करून आम्हाला पुन्हा उभे राहण्यासाठी आधार द्यावा.

घटनेची माहिती मिळताच करेवडगावचे सरपंच पती परिवंत गायकवाड यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शासनाकडून योग्य ती मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली.

दरम्यान, आष्टी मतदारसंघाचे आमदार डीशीह उहरी यांनी या घटनेची गंभीर दखल घेत तहसीलदार वैशाली पाटील आणि कृषी अधिकारी गोरख तरटे यांना तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले. ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाच्या माध्यमातून शक्य तितक्या लवकर मदत मिळवून दिली जाईल. कुणीही घाबरू नये, असा दिलासादायक संदेश त्यांनी नुकसानग्रस्तांना दिला.

अवकाळी पावसाने आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर नव्या अडचणी उभ्या केल्या आहेत. शेतीतील नुकसान, घरांची पडझड आणि संसार उद्ध्वस्त झाल्याने अनेक कुटुंबे हवालदिल झाली आहेत. शासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून मदत जाहीर केल्यास अशा कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.

# बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आगामी काळात दि. १४ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती व दि. २७ मे २०२६ रोजी बकरी ईद असून विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

दिनांक १३ मे २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि.२७ मे २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## पान ६ वरुन...

### दरोडा व बलात्काराच्या

तिथे पोलीसांनी तिचा जबाब नोंदवल्यावर आरोपी सौरभ गायकवाड व इतर दोघे यांचे विरुध्द भा.द.वि.चे कलम ३७६, ३९४ अंतर्गत गुन्हा नोंदवला व सदर गुन्हयाचा तपास अंभोरा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. बी. कोळेकर यांनी करून आरोपी सौरभ गायकवाड याचे विरुध्द दोषारोपपत्र बीड येथील सत्र न्यायालयात दाखल केले.

सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. पिडीतेचा न्यायालयासमोर जबाब व सरकार पक्षाने सादर केलेल्या भक्कम पुराव्यामुळे व सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादामुळे न्यायालयाने आरोपी सौरभ गायकवाड यास सदर गुन्हयाकामी दोषी धरून त्याला कलम ३७६ भादवी प्रमाणे १० वर्षे शिक्षा व रूपये १०,०००/- दंड, तसेच कलम ३९४ भा. द. वि. प्रमाणे ७ वर्षे शिक्षा व रु. ५,०००/- दंड तसेच कलम ३२४ भादवि प्रमाणे २ वर्षे शिक्षा तसेच कलम ३२३ भादवि प्रमाणे ६ महिने शिक्षा व ५,०००/- रूपये दंड ठोठावला आहे. सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने अतिरीक्त सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी काम पाहिले. त्यांना अतिरिक्त सरकारी वकील अँड. अजय तांदळे यांनी मदत केली व पैरवी म्हणुन महिला पोलीस जेवे यांनी कामकाज पाहिले.

### माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात

संचालक यांचे दि.०८ मे२०२६ व मा. जिल्हा उपनिबंधक कार्यालय बीड यांचे पत्र दि.११ मे २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विना परवाना शेतीमाल खरेदी - विक्री करणा-या व्यापा-यांवर कारवाई करण्याचा ईशारा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिला आहे.

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक

सुहृदयी हाडाचा शिक्षक गमावला. त्यांच्या पश्चात तीन मुली-जावई, एक मुलगा-सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे खान कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक लोकतंत्र परिवार सहभागी आहे. रुग्णालयात उपचार सुरू होते परंतु त्यांच्या शरीराने उपचारांना साथ न दिल्याने त्यांची प्राणज्योत अखेर मालवली. त्यांच्या निधनाने खान कुटुंबीयांनी घरातला कर्ता पुरुष आणि समाजाने एक चांगला.

### जिल्हा परिषद प्रशासनाचा

विभाग प्रमुखांना कडक सूचना

मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केवळ या १३ कर्मचाऱ्यांवरच न थांबता, सर्व विभाग प्रमुखांनाही स्पष्ट सूचना दिल्या आहेत. या यादीव्यतिरिक्त इतर कोणत्याही कर्मचाऱ्याला जर अतिरिक्त कार्यभारावर घेण्यात आले असेल, तर त्यांनाही तातडीने कार्यमुक्त करावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या प्रक्रियेत विलंब किंवा अनियमितता झाल्यास संबंधित विभाग प्रमुखांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### वादळी वाऱ्यात सोलार संच

अहवालात नमूद करण्यात आले आहे.अतिशय कष्टाने उभा केलेला सौर प्रकल्प डोळ्यादेखत नष्ट झाल्यामुळे शेतकरी परमेश्वर सानप यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाने आणि विभागाने या नुकसानीची तात्काळ गंभीर दखल घेऊन पीडित शेतकऱ्याला शासनाकडून भरीव आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी जवळाला येथील ग्रामस्थांनी केली आहे.

# अंबाजोगाईत परिचारिकांचे दोन तास काम बंद आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई परिचारिका संघटना शाखा लातूर यांच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दोन तास काम बंद आंदोलन करण्यात आले.**




या आंदोलनाचे नेतृत्व अंबाजोगाई शाखेच्या अध्यक्षा आशा यादव, सचिव कृष्णा शिंदे, यांनी केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, परिचारिका व असंख्य सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासनाने परिचारिकांच्या विविध मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

परिचारिकांना महागाई भत्ता वेतनवाढ, रिक्त पदांची भरती, संबंधित रुग्णालयातील ओपीडी चिठ्ठी, एक्स-रे एमआरआय आशा संबंधित परिचारिकांना मोफत करण्यात यावे, इतर प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. ''जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,'' असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. दोन तासांच्या काम बंद आंदोलनामुळे रुग्णालयातील काही सेवा विस्कळीत झाल्या होत्या. मात्र, अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला. दरम्यान, परिचारिकांच्या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द तालुका अंबाजोगाई या ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या तपासणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची तसेच गावातील मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली.

तपासणी पथकाने गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी व्यवस्थापन, नाली स्वच्छता, हरित उपक्रम, सार्वजनिक सुविधा, परसबाग,व्यायाम शाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, उर्दू शाळा,शौचालय, समशानभूमी आधी ग्रामविकास योजनांची पाहणी अक्कलकोट येथून आलेले गटविकास अधिकारी यांच्या टीमने केली. तपासणीसाठी



गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट श्री कवित्के, विस्तार अधिकारी श्री. माने,श्रीपाटील, श्री. पोतदार या पथकाने धानोरा खुर्द गावाचे तालुकास्तरीय तपासणी केली . तपासणी कामी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन धुमाळ सचिव शौलेश शिंदे कृषी अधिकारी प्रवीण मोरे, गडदे, ग्रामपंचायत अधिकारी श्री निकम, मेंगले , सुनील मामडगे , प्रमोद जोगदंड, सरपंच पार्वतीबाई पोळ,सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, सूर्यकांत धायगुडे, शिपाई असलम सय्यद,जमालुद्दीन सय्यद, माऊली वाघमारे यांनी सहकार्य केले. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचेही अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळत असून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# गेवराईत अवैध गोवंश कत्तलींचा सुळसुळाट; मुख्यमंत्र्यांकडे थेट तक्रार, कठोर कारवाईची मागणी -शुभम म्हेत्रे

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई शहर आणि लगतच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध गोवंश हत्या आणि जनावरांची कत्तल केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या गंभीर आणि संतापजनक प्रकाराची दखल घेत, स्थानिक नागरिकांच्या वतीने थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे लेखी पत्राद्वारे तात्काळ बंदी घालून कठोर कारवाई करण्याची युवा नेते शुभम म्हेत्रे यांनी आपले सरकार या पोर्टलवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे.



महाराष्ट्र राज्य प्राणी संरक्षण (सुधारणा) कायद्यानुसार राज्यात गोवंश हत्या हा पूर्णपणे अजामीनपात्र गुन्हा आहे. असे असतानाही गेवराई शहरात कायद्याचा कोणताही धाक न बाळगता छुप्या पद्धतीने कत्तलखाने चालवले जात आहेत. जनावरांची अवैध वाहतूक आणि कत्तल करणाऱ्या गुन्हेगारांना प्रशासनाचा कोणताही डर राहिलेला नाही, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.या अवैध कृत्यांमुळे गेवराई शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या धार्मिक भावना तीव्रतेने दुखावत आहेत. या वाढत्या प्रकारांमुळे शहरात कधीही सामाजिक शांतता भंग होऊन कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.अवैध कत्तलखान्यांबाबत स्थानिक पोलीस प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाला वारंवार कल्पना देण्यात आली आहे. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस किंवा कायमस्वरूपी कारवाई होताना दिसत नाही. स्थानिक प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळेच गुन्हेगारांचे मनोबल अधिक वाढत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.हे अवैध कत्तलखाने मानवी वस्तीच्या अत्यंत जवळ चालवले जात आहेत. कत्तलीनंतर टाकण्यात येणाऱ्या अवशेषांमुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला आहे. महामारी पसरण्याची भीतीही व्यक्त होत आहे.गेवराई शहरातील सर्व अवैध कत्तलखान्यांचा शोध घेऊन ते कायमस्वरूपी उद्ध्वस्त करण्यात यावेत.या अवैध व्यवसायामागील मुख्य सूत्रधारांवर केवळ साधी कारवाई न करता मोक्का () किंवा तडीपारी सारखी कठोर कायदेशीर कारवाई व्हावी.जनावरांची अवैध वाहतूक करणारी वाहने जप्त करून त्यांचे परवाने (परमिट) कायमचे रद्द करण्यात यावेत.मुख्यमंत्र्यांनी स्वतः गृह विभाग आणि बीड जिल्हा प्रशासनाला तात्काळ कडक आदेश द्यावेत.गेवराईतील या संवेदनशील प्रकरणात आता राज्य सरकार आणि मुख्यमंत्री सचिवालय काय पावले उचलणार, याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पाकिस्तानी डॉन शहजाद भट्टीच्या सिंडिकेटसोबत संपर्काचा संशय ; आष्टीतील दोन तरुणांची चौकशी, एटीएसची कारवाई!

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बुधवारी राज्यभरात ४० ठिकाणी मोठी छापेमारी करत पाकिस्तानस्थित गँगस्टर आणि 'आयएसआय'चा हस्तक शहजाद भट्टी याच्या सिंडिकेटशी संबंधित असल्याच्या संशयावरून ५३ तरुणांना ताब्यात घेतले. या कारवाईचे धागेदोरे बीड जिल्ह्यापर्यंत पोहोचले असून आष्टी तालुक्यातील आष्टा येथील दोन तरुणांची एटीएसने कसून चौकशी केली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांचे ब्रेनवॉश करून त्यांना देशविरोधी कारवायांसाठी प्रवृत्त करण्याचा कट या कारवाईमुळे उघडकीस आला आहे.

एटीएसने बुधवारी पहाटेच आष्टी तालुक्यातील आष्टा गावातील शेतकरी कुटुंबातील दोन तरुणांच्या घरावर धाड टाकली. या दोघांचे फोन नंबर एटीएसला मिळालेल्या संशयित यादीत असल्याने ही कारवाई करण्यात आली. राँग नंबरवरून फोन आल्याने हे तरुण यंत्रणेच्या रडारवर आले होते. पथकाने दिवसभर या तरुणांच्या मोबाईलची तांत्रिक तपासणी केली असून त्यांचे डिजिटल व्यवहार आणि सोशल मीडिया खात्यांची पडताळणी केली. प्राथमिक




तपासात कोणताही आक्षेपार्ह पुरावा न सापडल्याने या तरुणांना चौकशीनंतर सोडून देण्यात आले असले तरी, या घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

राज्यभरात झालेल्या या व्यापक कारवाईत मराठवाड्यातून ११ जणांची चौकशी करण्यात आली, ज्यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील १३, बीडमधील २, नांदेडमधील २ आणि जालना व लातूर येथील प्रत्येकी एकाचा समावेश आहे. ताब्यात घेतलेल्या ५३ पैकी २१ जणांवर अटकेची टांगती तलवार असून त्यांच्याकडे संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि डिजिटल पुरावे आढळले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कारवाईचे कौतुक केले असून दोषींवर 'यूएपीए' अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

दुबईतून गँग ऑपरेट करणाऱ्या शहजाद भट्टीने सोशल मीडियाच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांना पैसे आणि सत्तेचे आमिष दाखवून त्यांचे 'डिजिटल ब्रेनवॉशिंग' करण्याचे तंत्र अवलंबले आहे. दिल्लीतील 'गँग बस्ट २.०' मोहिमेतून समोर आलेल्या माहितीनुसार, राज्यातील हे कनेक्शन उघड झाले असून सुरक्षा दलांच्या जवानांना 'टार्गेट' करण्याचा मोठा कट असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील पुढील तपास एटीएसचे वरिष्ठ अधिकारी करत असून आणखी मोठे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

cmyk

# खरीप २०२६ साठी प्रमाणित बियाण्यांचे दर जाहीर!

## शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांची परभणी विद्यापीठाकडून उपलब्धता

परभणी


खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार आणि प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत कार्यरत बीज प्रक्रिया केंद्राने विविध पिकांच्या बियाण्यांचे अधिकृत दरपत्रक जाहीर केले आहे. यामध्ये ज्वारी, मूग, तूर, सोयाबीन आणि बाजरी या प्रमुख पिकांच्या सुधारित वाणांचा समावेश असून शेतकऱ्यांकडून या बियाण्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. विद्यापीठाकडून उपलब्ध करण्यात आलेली ही बियाणे उच्च उत्पादनक्षम, रोगप्रतिकारक आणि स्थानिक हवामानाला अनुकूल असल्याने खरीप हंगामासाठी उपयुक्त मानली जात आहेत. शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व नियोजन करताना वेळेत प्रमाणित बियाण्यांची खरेदी करावी, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जाहीर करण्यात आलेल्या दरपत्रकानुसार ज्वारी पिकासाठी 'परभणी शक्ती' हा वाण प्रतिकिलो १२५ रुपये दराने उपलब्ध आहे. या वाणाची ४ किलोची बॅग ५०० रुपयांना विक्रीस ठेवण्यात आली आहे. कमी पावसाच्या परिस्थितीतही चांगले उत्पादन देणारा हा वाण म्हणून ओळखला जातो.



मूग पिकासाठी 'बीएम-२००३-२' हा वाण प्रतिकिलो २२० रुपये दराने उपलब्ध असून ६ किलोच्या बॅगची किंमत १ हजार ३२० रुपये निश्चित करण्यात आली आहे. हा वाण जलद वाढ, चांगली उगवण क्षमता आणि बाजारपेठेत मागणी असलेल्या दर्जेदार उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. तूर पिकासाठी 'बीडीएन-१३-४१ गोदावरी (पांढरी)' तसेच 'बीडीएन-७१६ (लाल)' हे दोन वाण विक्रीस ठेवण्यात आले आहेत. या बियाण्यांचा दर प्रतिकिलो २५० रुपये असून २ किलो बॅग ५०० रुपये आणि ६ किलो बॅग १ हजार ५०० रुपयांना उपलब्ध आहे. मराठवाड्यातील हवामानासाठी हे वाण उपयुक्त मानले जातात. सोयाबीन पिकासाठी 'एमएयूएस-१६२' आणि 'एमएयूएस-६१२' हे सुधारित वाण प्रतिकिलो १०० रुपये दराने उपलब्ध असून २६ किलोच्या बॅगची किंमत २ हजार ६०० रुपये ठेवण्यात आली आहे. सोयाबीन क्षेत्रात उत्पादनवाढीसाठी हे वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. तसेच बाजरी पिकासाठी 'एचबी-१२००' या वाणाचे बियाणे प्रतिकिलो १९० रुपये दराने उपलब्ध असून १.५ किलो बॅग २८५ रुपयांना विक्रीस ठेवण्यात आली आहे. कमी पर्जन्यमानाच्या भागातही समाधानकारक उत्पादन देण्याची क्षमता या वाणात असल्याचे कृषी तज्ज्ञ सांगतात. बीज प्रक्रिया केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. संतोष अशोकराव शिंदे यांनी सांगितले की, खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेवटच्या क्षणी गर्दी टाळून वेळेत बियाण्यांची खरेदी करावी. प्रमाणित बियाण्यांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होऊन गुणवत्ताही सुधारते. तसेच योग्य वाणांची निवड आणि शिफारशीनुसार लागवड केल्यास शेतकऱ्यांना अधिक फायदा मिळू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. यंदा हवामानातील बदल आणि पावसाच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर कृषी विद्यापीठाने सुधारित वाणांवर भर दिला असून शेतकऱ्यांनी अधिकृत केंद्रातूनच बियाण्यांची खरेदी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तूर पिकाचे सुधारित वाण आणि वैशिष्टे



तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते.

तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी.

बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी,हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण.पांढऱ्या दाण्याचे वाण : बी डी एन ७११ ,गोदावरी ,बी एस एम आर ८५३. लाल/तांबड्या /तपकिरी/ फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी ,फुले तृप्ती ,फुले पल्लवी ,बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६,,आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी विकसित वाण : फुले पल्लवी, फुले तृप्ती, फुले राजेश्वरी, पी.के .व्ही.तारा, पी.डी. के.व्ही.आश्लेषा, ए के टी ८८११. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे वाण : बी डी एन पी एच-१८-५, बी डी. एन ७०८ (अमोल), बी.डी. एन ७११, बी.डी. एन ७१६, गोदावरी (बी.डी.एन. २०१३ - ४१), रेणुका, बी.एस एम आर. ७३६, बी.एस एम आर ८५३,


इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण : आय सी पी एल ८७ (प्रगती), आय सी पी एल ८७११९ (आशा),

## ठिबकद्वारे खते द्या थेट मुळांशी

ठिबक सिंचन पद्धतीत पाण्याद्वारे पाण्यात विरघळणारी (विद्राव्य) खते पिकाच्या मुळांशी योग्य त्या प्रमाणात व पाहिजे त्या वेळी (पिकांच्या गरजेनुसार) परिणामकारकरित्या देता येतात. पाण्याबरोबर खते व मूलद्रव्ये देण्याच्या या प्रकारास शास्त्रीय भाषेत फर्टिगेशन असे म्हणतात.

ठिबक सिंचनाद्वारे खते देताना प्रमाणबद्ध आणि मात्राबद्ध पद्धतीने देता येतात. प्रमाणबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता खत देण्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये स्थिर राहते. खतमात्रा व पाण्याचा प्रवाह सतत एकसारखा राहतो. उदा. एक लिटर खत द्रावण आणि १०० लिटर पाणी या पद्धतीमध्ये खतमात्रा तीव्रतेच्या स्वरूपात म्हणजेच ''पीपीएम'मध्ये मोजली जाते. मात्राबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता बदलत राहते. ठिबक सिंचनाद्वारे खत मिश्रित व खत विरहित पाणी पिकाच्या मुळांशी सतत दिले जाते. या पद्धतीमध्ये खतमात्रा कि. ग्रॅम/हेक्टर या स्वरूपात मोजली जाते.

फर्टिगेशनचे फायदे :खतांचा अधिक कार्यक्षमतेने वापर. द्रवरूप खत पिकांच्या मुळांद्वारे लवकर शोषली जातात. त्यामुळे खतांचा अपव्यय टळतो. त्यामुळे खतमात्रेत २५ ते ५० टकके बचत होते. तर पाण्यामध्ये ३० ते ५० टक्के बचत होते. खतांच्या उपलब्धतेत वाढ. पिकांच्या मुळांच्या जवळच खत आणि पाणी दिलं जातं. त्यामुळे खत आणि पाणी यांची वापरक्षमता वाढते.



मजुरीच्या खर्चात बचत :पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. दर्जेदार व अधिक उत्पन्न मिळते. पीक लवकर तयार होते. उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते.

जमीनीच आरोग्य अबाधित राखलं जाते :द्रवरूप खतातून पिकाला लागणारी सर्वच्या सर्व अन्नद्रव्य एकाच वेळी दिली जातात. हलक्या प्रतीच्या जमिनीत देखील पिकं घेता येतात. आम्लयुक्त विद्राव्य खतामुळे ठिबक संचामध्ये आपोआप रासायनिक स्वच्छता होते. पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. खतांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्क्यांपर्यंत वाढविता येते. विद्राव्य खतांमध्ये सोडियम आणि क्लोरिनचे प्रमाण अतिशय कमी असते. सूक्ष्म द्रवरूप खतांची फवारणी पिकांवर त्वरित करता येते.

फर्टिगेशनसाठी खते निवडतांना घ्यावयाची काळजी :खते पाण्यामध्ये लवकरात लवकर विरघळणारी असावीत. खतांची विरघळण्याची क्षमता अधिक असावी. पाण्यात विरघळल्यानंतर त्यातील क्षारांचे अविद्राव्य स्वरुपात एकत्रीकरण होता कामा नये. खताच्या संचाच्या घटकांवर कोणताही परिणाम होणार नाही अशी खते निवडावीत. खते शेतातील वापरासाठी सुरक्षित असावीत. खतांची पाण्यात असणाऱ्या क्षारांबरोबर कोणत्याही प्रकारची रासायनिक अभिक्रिया होणार नाही याची काळजी घ्यावी. एकाच वेळी एकापेक्षा अधिक खते एकत्र द्यावयाची असल्यास त्यांची आपापसात कोणतीही रासायनिक अभिक्रिया होणार नाही अशीच खते एकत्रित द्यावीत. ठिबक संचातून युरिया, डायअमोनियम फॉस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅश हि खते देता येतात

फर्टिगेशनसाठी उपकरणे :सूक्ष्म सिंचन संचातून पिकांना विद्राव्य खते देण्यासाठी प्रामुख्याने खताची टाकी / फर्टिलायझर टँक , व्हेन्चुरी इंजेक्शन पंप इत्यादी उपकरणे वापरली जातात. वर नमूद सर्व उपकरणांमध्ये सर्वाधिक वापरले जाणारे व फायदेशीर असे उपकरण आहे व्हेन्चुरी.

व्हेन्चुरी तंत्रज्ञान :व्हेन्चुरी ही डमरूच्या आकाराची मध्यभागी कमी होत जाणारी व्यासाची असल्यामुळे पाण्याचा वाहण्याचा वेग वाढतो व व्हेन्चुरीच्या मध्यभागी उपलब्ध दाब कमी होऊन हवेची पोकळी निर्माण होते (व्हॅकयूम). ह्यामुळे खताच्या टाकीमधील खताच्या द्रावणाचे शोषण होऊन पुढे मुख्य नळीमधून संचामध्ये आलेले खत उपनळ्यांमधून सिंचनाच्या वेळी ड्रीपर्समार्फत पिकांच्या मुळांजवळ दिले जाते. खत टाकीमधील पाण्यात मिसळावे व नंतर त्या टाकीत व्हेन्चुरी नलिकेतून निघालेली नळी सोडण्यात यावी.ठिबक सिंचन संच सुरु केल्यानंतर दोन्ही नियंत्रण झडपा सुरु केल्या कि मग टाकीतील खते व्हेन्चुरीतून शोषले/ ओढले जातात व ते संचाच्या पाईपमधील पाण्याच्या प्रवाहात मिसळून उपनलीकेवरील असलेल्या ड्रीपरमधून झाडांच्या / पिकांच्या मुळांच्या कक्षेत सोडले जातात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७१८ : जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
१७३० : रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
१८११ : पॅराग्वेला (स्पेनकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१८३६ : सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणार्या 'बेलीज बीड्?स'चे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
१९०५ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वेगास शहराची स्थापना करण्यात आली.
१९२८ : मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शो मधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
१९३५ : मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९४० : सॅन बर्नाडिनो, कॅलिफोर्निया येथे 'मॅक्डोनाल्डस'चे पहिले उपहारगृह सुरू झाले.
१९४० : दुसरे महायुद्ध हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५८ : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ३ चे प्रक्षेपण केले.
१९६० : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ४ चे प्रक्षेपण केले.
१९६१ : पुण्याच्या चतु:शृंगी वीजकेंद्रात प्रचंड स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू
१९८० : संपूर्ण भारतीय बनावटीच्या गोदावरी या पाणबुडीचे माझगाव गोदीमध्ये जलावतरण.
१९९३ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिवार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
२००० : दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील मंडीपुरा येथे अतिरेक्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जम्मू काश्मीरचे ऊर्जा राज्यमंत्री गुलाम हसन बट यांच्यासह ५ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारक.
१८५९ : पिएर क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ.
१८९२ : भारतीय वकील व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभा मतदार संघाचे सदस्य आणि मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल हरि विनायक पाटसकर यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. श्री. जोग साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७७)
१९०७ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१४ : तेनसिंग नोर्गे, एव्हरेस्ट वर प्रथम चढाई करणार्या एडमंड हिलरी यांचे सहकारी.
१९२६ : माजी भारतीय नौदल अधिकारी महेंद्रनाथ मुल्ला यांचा जन्मदिन.
१९६७ : माधुरी दिक्षीत-नेने अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत जनाबाई.
१७२९ : वैशाख व. १४, शके १६५१ मराठेशाहीच्या आपत्?प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन.
१९५८ : मुगल राजघराण्यातील प्रमुख भारतीय इतिहासकार यदुनाथ सरकार यांचे निधन.
१९९३ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (जन्म: २८ जानेवारी १८९९)
१९९४ : पी. सरदार, चित्रकार व दिनदर्शिका चित्र निर्माता.
१९९४ : ओम अग्रवाल जागतिक हौशी स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेतील एकमेव भारतीय विजेता
२००० : सज्जन जुन्या जमान्यातील चित्रपट व नाट्य अभिनेते. तलाक (१९५८), बीस साल बाद (१९६२)
२००३ : अमेरिकेतील प्रसिद्ध गायिका जून कार्टर यांचे निधन
२००७ : लिबर्टी विद्यापीठाचे स्थापक जेरी फेलवेल यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९३३)
२०१० : भारताचे ११ वे उपराष्ट्रपती व राजस्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत यांचे निधन.

## भुईमूगासाठी प्लॅस्टीक आच्छादन तंत्रज्ञान

महाराष्ट्राच्या बहुतांश - भागात मार्च अखेरपर्यंत पाण्याची कमतरता भासत नाही. त्यामुळे भुईमूग लवकर पेरून (नोव्हेंबर-डिसेंबर) पाणी कमी होण्यापूर्वी काढणी करण्याला तापमानाच्या मर्यादा निर्माण होतात. यावर मात करण्यासाठी पारदर्शक प्लॅस्टिक आच्छादनाचा वापर करून भुईमूगाची पेरणी नोव्हेंबरमध्ये आणि काढणी मार्च अखेरपर्यंत करणे शक्य झाले आहे.

प्लॅस्टीक फिल्म कसे असावे ?

प्लॅस्टीक आच्छादन पारदर्शक असावे. आच्छादन अतिशय पातळ आणि पारदर्शक असावे जेणेकरून सूर्याची उष्णता जमिनीपर्यंत पोहोचेल. आच्छादनाची जाडी सुमारे ५ ते ७ मायक्रॉन असावी. त्यामुळे भुईमूगाच्या आऱ्या आच्छादनातून सहजपणे जमिनीमध्ये जातील. आच्छादनाची रुंदी ९० सें. मी. पन्ह्याच्या प्लॅस्टीक कागदाप्रमाणे आणि लांबी शेताच्या आकारमानानुसार तसेच उतारानुसार ठेवावी. आच्छादनाच्या मध्यभागी २० सें.मी. अंतरावर तीन ओळींमध्ये १० सें.मी. वर ३ सें.मी. व्यासाची भोके पाडून घ्यावीत.

प्लॅस्टीक आच्छादनामुळे होणारे फायदे : जमिनीतील तापमान (५०-८० सें.) वाढते त्यामुळे थंडीच्या कालावधीत भुईमूगाची उगवण सुमारे ३ ते ४ दिवस लवकर होते. जमिनीतून होणारे बाष्पीभवन रोखले जाते.



त्यामुळे पिकास पाणी कमी लागते आणि २-३ पाण्याच्या पाळ्यांची बचत होते. जमिनीतील उपयुक्त जिवाणूंमध्ये वाढ होऊन त्यांची कार्यक्षमता वाढते. जमिनीतील जिवाणूंची वाढ झाल्यामुळे भुईमूगाची नत्र स्थिरीकरणाची क्षमता वाढते. तसेच इतर आवश्यक स्फुरद, पालाश इ. अन्नघटकांची उपलब्धता वाढते.

मुळांची वाढ जोमाने होते आणि मुळांचा एकूण विस्तार वाढतो. पिकाची वाढ जोमाने होते, फुले लवकर आणि जास्त प्रमाणात येतात. त्यामुळे शेंगांचे प्रमाण वाढून शेंगा भरण्यास जास्त कालावधी मिळतो.

उशिरा येणाऱ्या आऱ्या कमकुवत असल्यामुळे त्या प्लॅस्टिक फिल्म भेदून जमिनीत जाऊ शकत नाहीत. त्यामुळे जमिनीत गेलेल्या आऱ्यांमधील दाणे चांगले पोसले जातात आणि सर्व शेंगा जवळजवळ एकाच वेळी तयार होतात. ८ शेंगांतील तेल आणि प्रथिनांचे प्रमाण वाढते. भुईमूग साधारण ८-१० दिवस लवकर काढणीस तयार होतो. भुईमूगाची वाढ जोमाने झाल्यामुळे रोगांचे प्रमाण कमी होते. शेंगांचे उत्पादन वाढते.

जमिनीची मशागत आणि गादीवाफे तयार करणे :

खरीप पिकाच्या कापणीनंतर योग्य ओलावा असतानाच जमीन उभी आडवी नांगरावी. आणि दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन चांगली भुसभुशीत करावी. अशा प्रकारे जमीन समपातळीत आल्यानंतर ५० सें.मी. उंचीचे, ६० सें.मी. रुंदीचे गादीवाफे तयार करावेत. दोन गादीवाफ्यामधील अंतर ३० सें.मी. ठेवावे. गादीवाफ्याची लांबी जमिनीच्या उतारानुसार तसेच शेताच्या आकारमानानुसार निश्चित करावी.

योग्य जातीची आणि बियाण्याची निवड : रब्बी हंगामासाठी उपट्या प्रकारातील भुईमूग जातीची निवड करावी. उपट्या प्रकारातील जाती काढणीस सोप्या असतात. टी. जी. - २६, फुले प्रगती, टीओजी-२४ या सुधारित जाती वापराव्यात. बियाणे प्रमाणित, शुद्ध असावे तसेच बियाण्याची उगवणशक्ती ९० टक्क्याहून जास्त असावी. प्रति हेक्टरी १०० ते १२५ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बाविस्टीन अथवा थायरम बुरशीनाशकाची प्रती किलो बियाण्यास २.५ ग्रॅम या प्रमाणात प्रकिया करावी. त्यामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होत नाही. खत व्यवस्थापन : भुईमूगाचे पीक सेंद्रीय खतास चांगला प्रतिसाद देते. त्यामुळे गादीवाफे तयार करताना हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये वाफ्यावर मिसळावे. त्यानंतर हेक्टरी ५० कि.ग्रॅ. नत्र, १०० कि.ग्रॅ. स्फुरद आणि ६० किलो बालाश या खताची संपूर्ण मात्रा पेरणीपूर्वी ओळीमध्ये ८ ते १० सें.मी. खोलीवर पडेल अशा त-हेने द्यावी

प्लॅस्टीक आच्छादनाचा वापर : तणनाशक फवारणीनंतर प्लॅस्टीक आच्छादन गादी वाफ्यावर अंथरावे. आच्छादन स्थिर रहावे म्हणून दोन वाफ्यातील सरीमधील आच्छादनाच्या कडांवर मातीचा थर द्यावा.

पेरणी : आच्छादन गादी वाफ्यावर अंथरल्यावर दोन वाफ्यातील सरीमध्ये उभे राहून आच्छादनास पाडलेल्या ३-४ सें. मी. खोलीवर बियाण्याची पेरणी करावी. प्रत्येक ठिकाणी दोन बिया टाकाव्यात आणि बियाणे मातीने झाकून घ्यावे. पेरणीनंतर ५-६ दिवस राखण करणे आवश्यक आहे. कारण कावळे व इतर पक्षी बियाणे अथवा कोंब खातात. पेरणी नोव्हेंबरमध्ये करावी. पेरणीसाठी प्रती हेक्टरी १०५ ते १२५ किलो बियाणे वापरावे. पेरणीनंतर सुमारे ५-७ दिवसांत भुईमूगाची उगवण होते. त्यानंतर न भुईमूगाच्या फांद्या किंवा पाने आच्छादनाखाली राहणार '' नाहीत याची काळजी घ्यावी. अशी रोपे हाताने भोकातून अलगद बाहेर काढावीत. तसे न केल्यास फांद्या व आच्छादनाखाली पिवळी पडतात आणि कालांतराने अति उष्णतेत करपून जाण्याची शक्यता असते.

पाणी व्यवस्थापन : आच्छादनाचा वापर केल्यामुळे पिकास पाणी कमी लागते. त्यामुळे पाण्याच्या १-२ पाळ्या कमी लागतात. पिकाच्या वाढीच्या कालावधीमध्ये दोन पाळ्यांतील अंतर १५-२० दिवस ठेवावे. मात्र पीक फुलोऱ्यात असताना तसेच शेंगा भरण्याच्या वेळेस पाण्याच्या दोन पाळ्यांमधील अंतर सुमारे १२ ते १५ दिवस असावे. अशा प्रकारे पिकास एकूण ८-९ पाण्याच्या पाळ्या पुरेशा आहेत.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि.१५ मे २०२६ ५

# डिजिटल स्व-गणना मोहिमेला मोठा प्रतिसाद; ५ गावांत १०० टक्के नोंदणी पूर्ण-जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

भारत सरकारच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या जनगणना २०२७ अंतर्गत डिजिटल स्व-गणना मोहिमेला जालना जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक गावांनी शंभर टक्के स्व-गणना पूर्ण करण्याचा मान मिळवला आहे. केंद्र सरकारच्या जनगणना विभागाने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना घरबसल्या स्व-गणना करण्याची सुविधा मिळाली असून जिल्हा प्रशासन, तहसील कार्यालये आणि ग्रामपंचायत यंत्रणा यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर जनजागृती मोहिमा, विशेष शिबिरे आणि ऑनलाइन सहाय्य केंद्रांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अनेक गावांनी अल्पावधीत शंभर टक्के स्व-गणना पूर्ण करत आदर्श निर्माण केला आहे. भोकरदन तालुक्यातील मोहदरी या गावाने विशेष कामगिरी करत गावातील सर्व कुटुंबांची स्व-गणना पूर्ण केली आहे. गावातील एकूण ८०



कुटुंबांपैकी सर्वांनी ऑनलाइन नोंदणी केली असून प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसेच हातडी या गावातील ६२ कुटुंबांनीही स्व-गणना पूर्ण केली आहे. या दोन्ही गावांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करून नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक, तलाठी आणि महसूल कर्मचाऱ्यांनी घरभेटी देत नागरिकांना ऑनलाइन प्रक्रियेबाबत माहिती दिली.

याशिवाय जाफ्राबाद तालुक्यातील डोंगरगाव येथेही स्व-गणना मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गावातील सर्व कुटुंबांनी ऑनलाइन माध्यमातून माहिती नोंदवून मोहिम यशस्वी केली आहे. बदनापूर तालुक्यातील मंठा येथील १६८ घरांपैकी १०० घरांनी स्व-गणना पूर्ण केल्याची माहिती प्रशासनाने दिली. या भागात तहसील कार्यालय, महसूल विभाग आणि जनगणना कर्मचारी यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत मोहिमेबाबत जनजागृती केली. जिल्हा प्रशासनाकडून गावोगावी प्रचार आणि प्रबोधन मोहीम राबवली जात असून नागरिकांना डिजिटल स्व-गणनेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. जनगणना प्रक्रियेमध्ये नागरिकांचा थेट सहभाग वाढविणे, माहिती संकलन अधिक अचूक करणे आणि वेळेची बचत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नागरिकांनी स्वतःची माहिती नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. ऑनलाइन नोंदणी करताना अडचणी आल्यास टोल फ्री क्रमांक १८५५ वर संपर्क साधण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्व-गणना मोहिमेस केवळ दोन दिवसाचा कालावधी राहिला असुन, या दोन दिवसात जिल्ह्यातील गावांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबवून शंभर टक्के स्व-गणना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून डिजिटल भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## || थोडक्यात

### राज्य सरकारने कांदा उत्पादकांना अनुदान द्यावे - प्रा. मोराळे

बीड । प्रतिनिधी

इराण - इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे भारताची निर्यात थांबली दुबईच्या मार्केटमध्ये माल ठेवायला जागा नाही. कारण त्यांच्या गोडावुन मधला माल आखाती देशात जाऊ शकला नाही. निर्यात बंद असल्यामुळे द्राक्ष, कांदा इत्यादी सर्व उत्पादक शेतकरी प्रचंड अडचणीत आले आहेत. भारतात बाजार भाव पडल्यामुळे उत्पादन खर्चही निघत नाही. अशावेळी या संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. त्यांना किमान २० रु. प्रमाणे अनुदान द्यावे अशी विनंती किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यापासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांची ससेहोलपट सुरू आहे, कांदा काढून तो ठेवता येत नाही. अवकाळी पावसामुळे त्याला झाकून ठेवावे लागत आहे. रोज ताडपत्री झाकायची हवा मिळावी म्हणून काढायची.त्यात पुन्हा उकाडा ४४ डिग्री तापमानामुळे कांदा सडत आहे. रक्त ओकुण घाम गाळून तयार केलेल्या मालाला ठेवायला जागा नाही. शेतातच ठेवावा लागत आहे. एका शेतकऱ्याने ६०० गोण्या कांदा पेटवून दिला, भगवान साबळे असे त्या शेतकऱ्याचे नाव आहे.१ रुपया किलोचा बेंगलोर, सोलापूरच्या मार्केटमध्ये मिळत आहे सरकारने तात्काळ २० रुपये किलो प्रमाणे या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान द्यावे अशी मागणी शेतकरी करीत आहे. तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्याला मदत करा. महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात ३८२४ इतक्या आत्महत्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. एकूण आत्महत्यापैकी ६% आत्महत्या कृषी क्षेत्राशी संबंधित आहे असा क्राइम बिरोचा रिपोर्ट आहे. वेळीच लक्ष दिले नाही तर पुन्हा शेतकरी आत्महत्या झाल्या तर याला सरकार जबाबदार असेल तात्काळ मदत करा असे आव्हान, प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे.

### तुळजाभवानी मंदिराच्या खजिन्यात मोठी भर

धाराशिव । प्रतिनिधी

श्री क्षेत्र तुळजापूर (जि. धाराशिव) येथील श्री तुळजाभवानी मंदिरात गेल्या १५ वर्षांत भाविकांनी २५० किलो सोने अर्पण केले आहे. मंदिर समितीची पारदर्शक कारभारामुळे २५० किलो सोन्यासह ४,००० किलो चांदी जमा झाली आहे. एका निर्णयाने मंदिर संपत्तीचे चित्र बदलल्याचे मानले जात आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांनी मार्च २०१० मध्ये दानपेट्या सील केल्या, लिलाव पद्धत बंद केली. त्यानंतर १५ वर्षांत ती २५० किलोवर पोचली. त्यापूर्वी म्हणजे १९९१ ते २००९ या २० वर्षांत दानपेटीतील सोन्याची नोंद केवळ ४६ ग्रॅम असल्याची मंदिराची जुनी नोंद असल्याचे सांगितले जाते.श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या धार्मिक विभागाकडून उपलब्ध अधिकृत माहितीनुसार मागच्या १५ वर्षांत २५३ किलो ३० ग्रॅम व ९० मिलिग्रॅम सोने, तर ४६१४ किलो ५२३ ग्रॅम ६५० मिलिग्रॅम चांदीचे दागिने देवीचरणी भाविकांनी अर्पण केल्याची नोंद आहे. एप्रिल २०१० ते मार्च २०२६ अखेर धार्मिक विभागाकडे जमा असलेल्या सोने, चांदीचे हे वजन आहे. या व्यतिरिक्त रोकड व अन्य मौल्यवान धातूंच्या वस्तूंची आकडेवारी वेगळी आहे.तुळजाभवानी देवीजींच्या दर्शनासाठी दरवर्षी राज्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगण या लगतच्या राज्यांसह देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. परिणामी, भाविकांकडून देवीजींच्या चरणी सोने, चांदी, आभूषणे अर्पण करण्यातही वाढ झाली आहे. मंदिर प्रशासनाच्या नोंदीतून नवरात्रोत्सव, यात्राकाळ, धार्मिक सोहळे या कालावधी हे प्रमाण अधिक असल्याचे नमूद केले आहे. ऑक्टोबर, डिसेंबर व जानेवारीत ही वाढ लक्षणीय नोंदविली गेली. मागील तीन वर्षांत देवीच्या चरणी ५० किलो सोन्याचे दागिने अर्पण करण्यात आले आहेत.

### परभणीत उष्णतेचा कहर; पारा ४२.७ अंश

परभणी। प्रतिनिधी

शहरात दोन आठवड्यांपुर्वी कमाल तापमान ४३.७ अंशापर्यंत पोहचले होते. त्यामुळे परभणी शहरासह संपूर्ण जिल्हाभरात अघोषित संचारबंदी लागू केल्यासारखे चित्र निर्माण झाले होते. मध्यंतरीच्या काळात तापमान ४० अंशाच्या खाली आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला होता. परंतू पुन्हा एकदा शहरात सूर्य तळपत असून उष्णतेचा कहर सकाळ पासून पहावयास मिळत आहे.मंगळवार, दि.१२ मे रोजी किमान २७.९ व कमाल ४२.७ अंश तापमान वनामकृविच्या हवामान विभागात नोंद करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील जनजीवन पुन्हा एकदा विस्कळीत झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. या वर्षी उन्हाळ्याच्या सुरूवाती पासूनच नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. शहरात दोन आठवड्यांपुर्वी कमाल तापमान ४३.७ अंशापर्यंत पोहचले होते. प्रशासनाकडून यलो अलर्ट देखील जारी करण्यात आला होता. मध्यंतरी अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता. तसेच काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी देखील लावली. त्यामुळे तापमानात मोठी घसरण होऊन कमाल तापमान ४० अंशाच्या खाली आले होते. त्यामुळे नागरिकांना उन्हाच्या प्रचंड तीव्रतेपासून दिलासा मिळाला होता.शहरात रविवार पासून पुन्हा एकदा सूर्य तळपत आहे. रविवार व सोमवार दोन्ही दिवस पारा ४१ अंशापर्यंत पोहचला होता. मंगळवारी मात्र यात वाढू होऊन कमाल तापमान ४२.७ अंशावर पोहचले. त्यामुळे नागरिकांना सकाळ पासूनच तीव्र उन्हाचा सामना करावा लागत होता. उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. त्यामुळे रस्ते व बाजारपेठ निर्मनुष्य झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. उन्हाच्या तीव्रतेमुळे जनजीवन पुन्हा एकदा विस्कळीत झाले होते.प्रशासनाने देखील उन्हाच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभुमीवर नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत महत्वाच्या कामाशिवाय बाहेर पडू नये असे आवाहन वेळोवेळी केले आहे.

## जामखेड येथे बालविवाह रोखला; 'उडान'चा यशस्वी हस्तक्षेप

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड येथे नियोजित असलेला बालविवाह 'स्नेहालय उडान' बालविवाह प्रतिबंधक अभियान, जामखेड पोलीस, जिल्हा महिला व बालविकास विभाग आणि चाईल्ड लाईन यांच्या संयुक्त हस्तक्षेपामुळे यशस्वीरित्या रोखण्यात आला. त्यामुळे एका अल्पवयीन मुलीचे भविष्य सुरक्षित झाले असून तिच्या शिक्षणाला नवे बळ मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड शहरातील एका कुटुंबाने त्यांच्या अल्पवयीन मुलीचा विवाह निश्चित केला होता. या संभाव्य बालविवाहाची माहिती 'उडान' आणि चाईल्ड लाईन हेल्पलाईनवर आलेल्या गोपनीय फोनद्वारे समन्वयक योगेश अब्दुले यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली तातडीने हालचाली सुरू केल्या.

पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, एस. डी. लोखंडे, शिवाजी कदम तसेच 'उडान'च्या कार्यकर्त्यांनी मुलगा व मुलीच्या पालकांशी संवाद साधत बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील तरतुदी समजावून सांगितल्या. मुलीचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे असणे बंधनकारक असल्याची माहिती देण्यात आली. तसेच बालविवाह घडवून आणल्यास कारावास व दंडाची तरतूद असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी अल्पवयीन वयातील विवाहामुळे मुलींच्या आरोग्यावर आणि मानसिक स्थितीवर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत समुपदेशन केले. 'उडान' प्रकल्प मुलीचे शिक्षण पुढे सुरू राहण्यासाठी प्रयत्नशील असून तिला स्वावलंबी बनविण्यासाठी मदत करणार असल्याचे योगेश अब्दुले यांनी सांगितले.

## अनैतिक मानवी प्रतिबंधक पोलिसांनी पीडित मुलीचा शोध लावला

जालना। प्रतिनिधी

दोन वर्षापासुन तपासावर प्रलंबित असलेल्या गुन्हयातील पिडीत मुलीचा कडुन शोध लावण्यात आला.तिर्थपुरी पोलीस ठाणे येथे दाखल गुरन ६४/२०२४ भादवी कलम ३६३ मधील फिर्यादी यांनी तक्रार दिली की, त्यांच्या १६ वर्ष वयाच्या अल्पवयीन मुलीस मुलीस दिनांक-१८/०३/२०२४ रोजी दुपारी अंदाजे ०२. वाजेच्या सुमारास तिर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना येथे राहणारा मुलगा नामे गजानन रावसाहेव वानखेडे वय २५ वर्ष याने लग्नाचे आमीष दाखवुन फुस लावुन पळवून नेले वरुन पोलीस ठाणे तिर्थपुरी जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेला दोन वर्षांचा कालावधी होवुन सुद्धा गुन्हयातील आरोपी व पिडीत मुलगी मिळुन न आल्याने सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास मा. पोलीस अधिक्षक सो यांच्या आदेशाने दि.०८/०१/२०२५ रोजी अ.मा.वा.प्र. कक्ष जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

अ.मा.प्र.कक्ष जालना येथील अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी याचे बाबत गोपनिय माहिती काढुन प्रकरणात तांत्रीक विश्लेषन करून नमुद आरोपी हा शिरोली ता. हातकणंगले जि. कोल्हापुर येथे राहत असल्याची माहिती मिळाली सदर ठिकाणी जावुन त्यांना ताब्यात घेवुन पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे तिर्थपुरी जालना येथे हजर केले आहे.सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघवीर सिंह संधु (भापोसे) उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री. अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पोहेकों सागर बावीस्कर (स्थागुशा) महिला अंमलदार पुष्पा खरटमल, संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

## वेरूळ लेणीमधील शिल्पकला पाहून इस्त्रायलचे वाणिज्य दूत प्रभावित

वेरूळ । प्रतिनिधी

वेरूळ इस्त्रायलचे वाणिज्य दूत यानिव रेव्हाच यांनी सोमवारी जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ लेणी तसेच बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर येथे भेट देत भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे मनापासून कौतुक केले. 'इतिहास, अध्यात्म आणि स्थापत्यकलेचा अद्भुत संगम येथे अनुभवायला मिळतो. हजारो वर्षांपूर्वी उभारलेल्या या वास्तू आजही जगाला प्रेरणा देणाऱ्या आहेत,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यानिव रेव्हाच यांनी सकाळी सर्वप्रथम वेरूळ लेणी परिसराला भेट दिली.

यावेळी त्यांनी विशेषतः प्रसिद्ध कैलास मंदिर अर्थात लेणी क्रमांक १६ मधील भव्य कोरीव शिल्पकलेचे बारकाईने निरीक्षण केले. एका अखंड दगडातून साकारण्यात आलेल्या या वास्तूचे त्यांनी विशेष कौतुक करत भारतीय शिल्पकलेच्या कौशल्याला सलाम केला. याशिवाय त्यांनी विश्वकर्मा लेणी (क्रमांक १०), बौद्ध लेणी (क्रमांक १२), इंद्रसभा, जगन्नाथ सभा आणि जैन लेणी परिसरालाही भेट देत तेथील धार्मिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य




वैशिष्ट्यांची माहिती जाणून घेतली. लेण्यांमधील सूक्ष्म कलाकुसर, दगडांवर कोरलेली विविध शिल्पे, प्राचीन काळातील वास्तुरचना आणि विविध धर्मांच्या एकात्मतेचे दर्शन घडवणारी रचना पाहून ते विशेष प्रभावित झाल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय इतिहास आणि संस्कृतीची भव्यता प्रत्यक्ष अनुभवण्याची ही अविस्मरणीय संधी असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी संरक्षक सहायक संजय रोहनकर, पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक आयुब पठाण, बापू डोंबळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रफिक पठाण, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर कोळी, खुशाल पाटील, महेश घुगे, शरद बचाव, एस. नीळ, योगेश जाधव आणि बाबासाहेब आढाव आदी उपस्थित होते. इस्त्रायलचे वाणिज्य दूत यानिव रेव्हाच यांनी श्री घृष्णेश्वर मंदिर येथे भेट देत दर्शन घेतले. श्री घृष्णेश्वर मंदिरात विधिवत पंचामृत अभिषेक, मंदिर इतिहासाची घेतली माहिती त्यांनी श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात जाऊन विधीवत पंचामृत अभिषेक केला व दर्शन घेतले. भारतीय संस्कृतीमध्ये अध्यात्माला असलेले महत्त्व आणि मंदिरांच्या माध्यमातून जपली गेलेली परंपरा जगासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. इतिहास अभ्यासक भरत जोशी यांनी त्यांना वेरूळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिराचा इतिहास, स्थापत्य वैशिष्ट्ये तसेच सांस्कृतिक परंपरेविषयी सविस्तर माहिती दिली.

## 'डायल ११२' च्या मदतीला पोहोचण्यास उशीर

### हिंगोलीत पोलिस अंमलदार निलंबित, पोलिस अधीक्षकांची मोठी कारवाई

हिंगोली । प्रतिनिधी

नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि तातडीच्या मदतीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या 'डायल ११२' सुविधेबाबत हिंगोली पोलीस दलाने अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. मदतीसाठी कॉल आल्यानंतर घटनास्थळी वेळेत न पोहोचल्यामुळे कळमनुरी पोलीस ठाण्यातील एका अंमलदाराला तात्काळ निलंबित केले आहे. त्यांच्या निलंबनाचे आदेश पोलीस अधीक्षक डॉक्टर निलाभ रोहन यांनी गुरुवारी ता. १४ काढले आहेत. हिंगोली जिल्ह्यातील तेरा पोलीस ठाण्यांतर्गत प्रत्येक गावांमधून मदतीसाठी डायल ११२ या क्रमांकावर कॉल आल्यास पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने मदतीसाठी पोहोचणे अपेक्षित आहे त्यासाठी सर्व पोलीस ठाण्यांमधून डायल ११२ हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, १२ मे रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास कळमनुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतून एका पीडित व्यक्तीने 'डायल ११२' वर मदतीसाठी कॉल केला होता. या कॉलला प्रतिसाद देऊन डायल ११२ वर नियुक्त पोलीस कर्मचारी मर्यादित वेळेत घटनास्थळी पोहोचणे अपेक्षित होते. मात्र त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस जमादार किशोर राठोड यांनी तब्बल दीड तास उशीर केला. सदर बाब पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांच्या निदर्शनास येताच त्यांनी जमादार राठोड याच्यावर निलंबनाची कारवाई केली. त्यांच्या निलंबनाचे आदेश गुरुवारी ता. १४ काढण्यात आले. पोलिस अधिक्षक डॉ. नीलाभ रोहन हे कर्तव्यकठोर आणि कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळखले जातात.

नागरिकांना पोलिसांची मदत जलद आणि विनाविलंब मिळावी यासाठी त्यांचे 'डायल ११२' वर बारकाईने नियंत्रण असते. पोलीस दलातील प्रत्येक कर्मचारी आणि अधिकाऱ्याने नागरिकांना उत्तम सेवा द्यावी, अशा सूचना त्यांनी आधीच दिल्या आहेत. मात्र त्यानंतरही जमादार राठोड यांनी कर्तव्यात कसूर केली त्यामुळे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे पोलीस दलात कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, ''कामात हलगर्जीपणा केल्यास गय केली जाणार नाही,'' असा स्पष्ट संदेश पोलीस अधीक्षकांनी यातून दिला आहे.

## पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्येचा फैसला लांबणीवर

### पद्मसिंह पाटीलांसह १० जणांच्या भवितव्याचा निर्णय; २ दशकांपासून खटला चर्चेत

मुंबई । प्रतिनिधी

बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्या प्रकरणाचा निकाल मुंबईतील विशेष सीबीआय न्यायालयात आज जाहीर होणार होता. मात्र, आता या प्रकरणातील आरोपी वैद्यकीय कारणामुळे न्यायालयात हजर राहू शकत नसल्याने निकालाचे वाचन १६ जूनपर्यंत लांबवणीवर पडले आहे. राज्याचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील आणि इतर नऊ आरोपींविरोधातील हा खटला गेली अनेक वर्षे चर्चेत राहिला आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाकडे केवळ निंबाळकर कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दोन दशकांपासून सुरू असलेल्या या प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रभावशाली नेते पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी परंडा-कळंब मार्गावर निर्घृण हत्या करण्यात आली होती. अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या वाहनावर गोळीबार केला होता. या हल्ल्यात पवनराजे निंबाळकर यांच्यासह त्यांच्या चालकाचाही मृत्यू झाला होता. दिवसाढवळ्या झालेल्या या दुहेरी हत्येमुळे संपूर्ण राज्य हादरले होते. त्यानंतर या प्रकरणाची राजकीय पातळीवर मोठी चर्चा सुरू झाली होती.

सुरुवातीला या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलिसांकडे होता. मात्र, हत्येमागील कट आणि त्यातील गंभीर आरोप लक्षात घेता हा तपास नंतर केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या.



राजकीय वादातून ही हत्या घडवून आणण्यात आल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला होता. तसेच २५ लाख रुपयांची सुपारी देण्यात आल्याचा आणि जवळपास १६ महिने हत्येची रेकी व नियोजन सुरू असल्याचा दावा तपासात करण्यात आला होता. सीबीआयने २००९ मध्ये पद्मसिंह पाटील यांना अटक केली होती. त्यावेळी ते राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित होते. गेली अनेक वर्षे या खटल्याची सुनावणी सुरू होती. आता अखेर विशेष सीबीआय न्यायालय या प्रकरणावर अंतिम निर्णय देणार आहे. त्यामुळे आरोपींचे भवितव्य, निंबाळकर कुटुंबाला मिळणारा न्याय आणि या गाजलेल्या हत्याकांडाचा शेवट कसा होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे.एकेकाळी धाराशिवच्या (तेव्हाचे उस्मानाबाद) राजकारणात ज्यांची जोडगोळी 'राम-लक्ष्मणा'सारखी मानली जायची, त्याच चुलत भावांच्या नात्याचा शेवट इतका भीषण होईल, याची कल्पना कोणीही केली नव्हती. डॉ. पद्‍सिंह पाटील आणि पवनराजे निंबाळकर यांच्यातले सख्य राजकीय महत्त्वकांक्षेतून कट्टर विरोधकांमध्ये बदलले. डॉ. पद्मसिंह पाटील यांचा २००४ च्या विधानसभा निवडणुकीत अगदी निसटता विजय झाला. पुढे मंत्रिपद हुकले. या साऱ्या पार्श्वभूमीवर पवनराजे निंबाळकरांची हत्या झाली. अर्थातच संशयाची सुई डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याकडे वळली. पवनराजे यांना राजकारणाची पहिली पायरी चढवून देणारे त्यांचे मोठे बंधू डॉ. पद्मसिंह पाटीलच होते. त्यांच्यावर पाटलांचा इतका अढळ विश्वास होता की, मुंबईत मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी आपल्या मतदारसंघाच्या 'रिमोट कंट्रोल'ची चावी आणि तेरणा साखर कारखान्याचं सर्वस्व पवनराजेंच्या हाती सोपवलं होतं. मात्र, याच सोपवलेल्या जबाबदारीतून पवनराजेंचे स्वतःचे एक स्वतंत्र वलय निर्माण झाले आणि इथूनच संघर्षाची पहिली ठिणगी पडली.

# पाटोदा गायरान जमीन मोजणीत घोळ

## भूमी अभिलेख अधिकाऱ्यांवर संगनमताचा आरोप ; उच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील सर्वे नंबर ७१५ मधील शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिलेले असतानाही, भूमी अभिलेख आणि महसूल विभागाचे अधिकारी राजकीय दबावाखाली चुकीची मोजणी करून अतिक्रमणधारकांना पाठीशी घालत असल्याचा खळबळजनक आरोप तक्रारदार शेख मोबीन हमीद यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी तक्रार देऊन दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

पाटोदा येथील सर्वे नंबर ७१५ या गायरान जमिनीवर नगरसेवक सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन यांनी बेकायदेशीर घराचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. या अतिक्रमणाविरुद्ध शेख मोबीन हमीद यांनी अ‍ॅड . एन. एल. जाधव यांच्यामार्फत छत्रपती संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका (क्र. २७/२०२५) दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाईचे निर्देश दिले होते.

**मोजणीत फेरफार केल्याचा आरोप**

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, १३ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जमिनीची हद्द निश्चित करण्यासाठी मोजणी आयोजित करण्यात आली होती. मात्र, निमतदार श्याम दिगंबर पुजारी व इतर अधिकाऱ्यांनी सर्वे नंबर ७१५ ऐवजी जाणीवपूर्वक सर्वे नंबर ७१२ मध्ये खुणा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, लगतच्या शेतमालकांना कोणतीही कायदेशीर नोटीस न देता ही प्रक्रिया गुप्तपणे पार पाडण्यात आली.

**सीमा बदलण्याचा प्रयत्न**

अभिलेखानुसार, सर्वे नंबर ७१२ मध्ये माध्यमिक शाळा पाटोदा आणि महाराष्ट्र शासनाची जमीन नोंदलेली आहे. ही जागा चुकीच्या पद्धतीने सर्वे नंबर ७१५ मध्ये दाखवून मूळ गायरान जमिनीची सीमा बदलण्याचा प्रयत्न अधिकारी करत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जुने नकाशे आणि टाउन प्लॅनिंगचे रेकॉर्ड डावलून केवळ अतिक्रमणधारकाचे बांधकाम वाचवण्यासाठी हा खटाटोप सुरू असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

**अवमान याचिकेचा इशारा**

''शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांना कोणत्याही दबावाखाली संरक्षण देता येणार नाही,'' असे सर्वोच्च न्यायालयाचे (जगपाल सिंग विरुद्ध पंजाब राज्य) स्पष्ट निर्देश आहेत. असे असतानाही अधिकारी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करत आहेत. जर या प्रकरणी तात्काळ निष्पक्ष चौकशी करून फेरमोजणी करण्यात आली नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध उच्च न्यायालयात न्यायालय अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा शेख मोबीन हमीद यांनी दिला आहे.

या तक्रारीच्या प्रती विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर आणि महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आता जिल्हाधिकारी यावर काय भूमिका घेतात, याकडे पाटोदावासियांचे लक्ष लागले आहे.

---

## मोमिनपुरासह शहरातील अवैध कत्तल खान्यावर बुलडोजर फिरवा– संभाजी सुर्वे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोमिनपुरा भागामध्ये सुरू असलेल्या कथित अवैध कत्तलखान्या विरोधात तीव्र



संताप व्यक्त करत संबंधित कत्तलखाना सह बीड शहरातील सर्व कत्तलखाने तात्काळ बंद करून त्यांना बुलडोजरने भुईसपाट करण्यात यावा, अशी मागणी भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मोमिनपुरा परिसरात अवैधरित्या गोवंश कत्तल सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने नागरिकांकडून होत आहेत. यामुळे परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अलीकडे पोलिस प्रशासनाने संबंधित ठिकाणी कारवाई करून ७ लाख किमतीचे ४७ गोवंश व मांस जप्त केल्याची घटना समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित अवैध कत्तलखाना बंद करावा व ज्या बांधकामात या सर्व कत्तल होतात ते बांधकाम हटवून भुईसपाट करावे तसेच संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारचे अवैध प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी भाजपा आयटी सेलचे प्रदेश सहसंयोजक संभाजी सुर्वे, योगेश भागवत, राजू शहाणे, पंकज धांडे सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

---

## आजच्या संवाद बैठकीस उपस्थित रहा– शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण व आ.विजयसिंह पंडित या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या दि.१५ मे रोजी सकाळी १०.०० वा.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय मित्र नगर चौक बीड येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी केले आहे.



उद्या होणाऱ्या बैठकीस राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष बीड जिल्ह्यातील आजी माजी आमदार,खासदार,प्रदेश पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष–शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, महिला, युवक, युवती, सर्व फ्रंटल सेलचे अध्यक्ष व कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी, नगराध्यक्ष, नगरसेवक, प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या बैठकीत उपस्थित रहावे असे आवाहन शेख निजाम यांनी केले आहे.

---

## दरोडा व बलात्काराच्या गुन्ह्यात आरोपीस दहा वर्षे सक्तमजुरी

बीड । प्रतिनिधी

बीड दरोडा व बलात्कार केल्याच्या गुन्हयात आरोपी सौरभ गायकवाड यास बीड येथील अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. एस.एस. घोरपडे साहेब यांनी १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दि. १४ मे २०२६ रोजी सुनावली आहे. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्याचे लक्ष वेधलेले होते. सहाय्यक सरकारी वकील अँड. मंजुषा एम. दराडे यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादामुळे न्यायालयाने आरोपी सौरभ गायकवाड यास दंडासह शिक्षा सुनावली आहे.



प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, अंभोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत फिर्यादी ही तिचे नवऱ्यासोबत अहिल्यानगरहून गावाकडे मोटारसायकलवर येत असताना रस्त्याच्या कडेला थांबली असता तिथे सौरभ गायकवाड व अन्य दोघे आले व त्यांनी प्रथम पिडीतेच्या नवऱ्याला मारहाण केली व अंधारात रस्त्याच्या कडेला नेवून आरोपी सौरभ गायकवाड याने पिडीता हिचेवर बळजबरीने बलात्कार केला. यानंतर पोलीसांची गाडी येत आहे असे दिसल्यावर आरोपी पळुन गेले व जाताना त्यांनी पिडीता व तिचे पतीचा मोबाईल व खिशातील १०,०००/– रूपये बळजबरीने घेऊन घटनास्थळावरून पोबारा केला.

त्यानंतर पोलीस तेथे आल्यानंतर पिडीतेला प्रथम चिंचोडी पाटील येथील दवाखान्यात व तेथुन अहिल्यानगर येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले व पान ३ वर

---

## माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी - विक्री करणाऱ्यावर कारवाई होणार -सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी – विक्री करणा–यांवर कारवाई होणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी दिली आहे.



महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी – विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. परंतु तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी – विक्री करत असल्याचा प्रकार घडत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यासंदर्भात परिपत्रक जाहिर केले असून संबंधितांना वेळोवेळी सुचना देवुनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी – विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. मा.पणन पान ३ वर

---

## वादळी वाऱ्यात सोलार संच उद्ध्वस्त; शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मौजे जवळाला येथे वादळी वारा आणि अवकाळी पावसामुळे एका शेतकऱ्याच्या शेतातील संपूर्ण सौर ऊर्जा (सोलर) संच उडून गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये संबंधित शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, महसूल प्रशासनाने आज घटनास्थळी धाव घेत नुकसानीचा पंचनामा केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, जवळाला येथील रहिवासी शेतकरी परमेश्वर साहेबराव सानप यांनी



आपल्या सर्व्हे नंबर १७१ मधील शेतात 'सीआरआय सोलर कंपनी'चा सौर ऊर्जा संच बसवला होता. काल १३ मे रोजी सायंकाळच्या सुमारास परिसरात अचानक विजांच्या कडकडाटासह जोरदार वादळी वारा आणि पाऊस सुरू झाला. या वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, शेतातील सोलर पॅनेल्सचा संच पाया उखडून पूर्णपणे उडून गेला. दूरवर पडल्यामुळे या संचाचे सर्व पॅनेल्स आणि लोखंडी सांगाडा चक्काचूर झाला असून संपूर्ण यंत्रणा निकामी झाली आहे.या दुर्घटनेनंतर आज १४ मे रोजी सकाळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आणि ग्राम अधिकाऱ्यांनी तातडीने सानप यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. गावातील पंच गणेश लक्ष्मण केकान , लक्ष्मण बाबुराव कोटुळे, बबन संतराम माने, रामकिसन बाजीराव माने आणि बबन दादाराव कोळुळे यांच्या उपस्थितीत अधिकृत पंचनामा करण्यात आला. वादळामुळे शेतकऱ्याचे शंभर टक्के नुकसान झाले असल्याचे या पंचनामा

---

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान खान पठाण यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

सायं. दैनिक बीड किसान चे कार्यकारी संपादक अदनान खान पठाण यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान खान पठाण यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांची नमाज़ ए जनाज़ा दिनांक १४ मे २०२६ गुरुवार रोजी दुपारी ०३:०० वाजता बालेपीर दरगाह मस्जिद येथे पठण करण्यात आली तर दरगाह कब्रस्तान येथेच दफनविधी करण्यात आला. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्ष होते.



उस्मान खान सर हे प्रथम सहशिक्षक म्हणून शिक्षण विभागात रुजू झाले होते. शैक्षणिक गुणवत्तापूर्ण शिक्षण व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देऊन चांगले विद्यार्थी घडवीत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना काही वर्षातच मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळाली होती. विद्यार्थ्यांना नेहमी चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे हाच ध्यास त्यांना नेहमी असायचा. विद्यार्थ्यांना ते आपल्या मुलांप्रमाणे जीव लावायचे. शिक्षक म्हणून ते जेवढे कर्तव्यदक्ष होते तेवढेच कठोर निर्णय घेणारे म्हणूनही प्रसिद्ध होते. शाळा, शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक कठोर निर्णय सुद्धा घेतले होते म्हणून ते सेवेत असताना आणि सेवानिवृत्त झाल्यावरही समाजात तेवढेच लोकप्रिय होते.

गेल्या काही काळापासून वृद्धापकाळाने आजारी असल्याने त्यांच्यावर पान ३ वर

---

## जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी

जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांच्या मातोश्री श्रीमती मालतीबाई माधवराव वाघमारे वय ८८ वर्ष यांचे आज बीड येथील निवासस्थानी दि १४ रोजी पहाटे ४ वाजता दुःखद निधन झाले त्याचा अत्यंविधी आज ५ वाजता अमर धाम मोंढा रोड,बीड येथे होणार आहे.



श्रीमती मालतीबाई माधवराव वाघमारे या मूळ रा अंबड येथील असून त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना नातवंडे असा परिवार आहे, जुन्या पिढीतील धार्मिक वृत्तीच्या श्रीमती मालतीबाई वाघमारे अंबड मध्ये मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून परिचित आहेत. काही महिन्यापूर्वीच मोठे चिरंजीव प्रसिद्ध निवेदक स्व मंगेश वाघमारे यांचे निधन झाले,त्यांनतर त्या बीड येथे पत्रकार महेश वाघमारे यांच्या निवासस्थानी राहत होत्या,आज अचानक पहाटेच त्यांची प्राणज्योत मालवली. वाघमारे कुटूंबीयांच्या दुःखात लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

---

## जिल्हा परिषद प्रशासनाचा मोठा निर्णय १३ कर्मचाऱ्यांची अतिरिक्त नियुक्ती रद्द

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, बीड अंतर्गत विविध विभागांमध्ये अतिरिक्त कार्यभारावर असलेल्या १३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती रद्द करून त्यांना मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी परतण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ झाली असून, सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना १३ मे २०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यात आले आहे.

का घेण्यात आला निर्णय?

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील प्रलंबित आणि कालमर्यादित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पंचायत समिती स्तरावरील काही कर्मचाऱ्यांना जिल्हा स्तरावर अतिरिक्त कार्यभारासाठी पाचारण करण्यात आले होते. मात्र, सध्या शासन स्तरावरून कोणत्याही नवीन योजना किंवा पदभरती प्रक्रिया सुरू नसल्याने या अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आता आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मूळ ठिकाणी हजर होण्याचे आदेश

जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार, १३ कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार तत्काळ प्रभावाने कमी करण्यात आला आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये गेवराई, वडवणी, पाटोदा, केज, धारूर, शिरूर आणि आष्टी येथील पंचायत समिती तसेच आरोग्य व ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होऊन तसा अहवाल सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पान ३ वर

---

## बाभळगाव येथे बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील बाभळगाव येथे क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त भव्य बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी बौद्ध विहार, बाभळगाव येथे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता पंचशील ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून, सायंकाळी ४ वाजता बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होईल. या कार्यक्रमासाठी पूजनीय भदंत पंय्यातिस्स (बुद्ध विहार, सिरसाळा) यांचे धर्मदेशन लाभणार असून रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजयदादा साळवे, भा.बो.म. बीड पूर्वचे जिल्हाध्यक्ष एस.बी. मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्राध्यापक संजय बागुल हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. हा सोहळा शांतता, समता आणि बंधुतेचा संदेश देणारा ठरणार असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## शिरूर कासार हिट अँड रन प्रकरणाचा उलगडा

### १५ दिवसांनंतर केजचा आरोपी गजाआड

शिरूर कासार । प्रतिनिधी

येथील येळम फाटा परिसरात २८ एप्रिल रोजी झालेल्या भीषण अपघाताचा छडा लावण्यात शिरूर पोलिसांना यश आले आहे. एका पांढऱ्या रंगाच्या अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत नामांकित मुकादम शिवाजी संपत कदम यांचा जागीच मृत्यू झाला होता. या हिट अँड रन प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी केज येथून ताब्यात घेतले आहे.

२८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५:२५ च्या सुमारास शिवाजी संपत कदम (वय ६१) हे शिरूर ते बीड रस्त्यावरील येळम फाटा येथे मॉर्निंग वॉक करत होते. यावेळी एका भरधाव अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात कदम यांचा जागीच मृत्यू झाला, तर चालक वाहन घेऊन फरार झाला होता.या घटनेनंतर शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्र. ७४/२०२६ नुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने घटनास्थळापासून बीड आणि अहिल्यानगरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरील सर्व सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली.

अखेर १५ दिवसांच्या तांत्रिक तपासानंतर पोलिसांनी रामेश्वर दत्तात्रय मोकाशी (वय ३६, रा. हनुमंत पिंप्री, ता. केज) याला निष्पन्न करून चारचाकी वाहनासह केज येथून ताब्यात घेतले.

यांनी केली कामगिरी

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस हवालदार सुरवसे, डिडुळ, नांगरे आणि पोलीस अंमलदार विधाते यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

---

## वच्छालाबाई रामकिसन गलधर यांचे दु:खद निधन

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील धुमेगाव येथील रहिवासी वच्छालाबाई रामकिसन गलधर (वय ९६) यांचे मंगळवार दि.१२ मे रोजी रात्री दुःखद निधन झाले. त्यांच्यावर बुधवारी सकाळी १० वाजता शोकाकूल वातावरणात धुमेगावच्या गलधर वस्ती येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



वच्छालाबाई रामकिसन गलधर या अतिशय प्रेमळ आणि मायाळू स्वभावाच्या होत्या त्यामुळे सर्वांना त्या आपल्याशा वाटत दरम्यान मंगळवार दि.१२ मे रोजी रात्री ९.४५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली तर बुधवार दि.१३ मे रोजी सकाळी १० वाजता त्यांच्यावर धुमेगावच्या गलधर वस्ती येथील स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुलगी, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे. सुधाकर रामकिसन गलधर यांच्या त्या आई होत. गलधर परिवाराच्या दुःखात दैनिक लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नीट घोटाळ्याचे 'पुणे कनेक्शन' उघड! ब्युटी पार्लर चालक महिलेसह इंजिनिअरिंगचा विद्यार्थी ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

**देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता पुण्यापर्यंत पोहोचले असून या घोटाळ्यातील पुणे कनेक्शन समोर आले आहे. सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून मुख्य संशयित धनंजय लोखंडे याला ताब्यात घेतले. त्यानंतर लोखंडेच्या संपर्कात असलेल्या बिबवेवाडीतील मनीषा वाघमारे आणि इंजिनिअरींग करणाऱ्या विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली.**

विद्यार्थी शोधणे, त्यांच्याकडून पैसे गोळा करणे आणि संशयितांपर्यंत पोहोचवणे, अशी भूमिका या दोघांची असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास हाती घेतल्यानंतर महाराष्ट्रातही हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. तपासादरम्यान धनंजय निवृत्ती लोखंडे (वय २६) हा महत्त्वाचा संशयित असल्याचे समोर आले. गेली चार-पाच वर्षे तो पुण्यातील वाघोली परिसरात राहत होता.

मंगळवारी (दि.१२) पुणे पोलिसांना वाघोली परिसरात लोखंडे याचे लोकेशन मिळाले होते. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच तो तेथून पसार झाला. त्यानंतर मध्यरात्रीनंतर राहुरी परिसरातून सीबीआयने त्याला ताब्यात घेतले. तपासादरम्यान धनंजय लोखंडे याच्या संपर्कात बिबवेवाडीतील मनीषा वाघमारे (वय ४७, रा. सुखसागर, बिबवेवाडी) असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली. त्यानुसार बुधवारी (दि.१३) सकाळी आठच्या सुमारास पोलिसांनी




तिला संशयित म्हणून ताब्यात घेतले.

दुपारी दोनच्या सुमारास तिला सीबीआयच्या ताब्यात देण्यात आले. मनीषा वाघमारे ही व्यवसायाने ब्युटी पार्लर चालक असून तिचा पती दंतचिकित्सक असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून ती धनंजय लोखंडेच्या संपर्कात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. प्राथमिक चौकशीत ती विद्यार्थ्यांना लोखंडेपर्यंत पोहोचवण्याचे काम करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तपासात समोर येत असलेल्या माहितीनुसार, पुण्यातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारे एक स्वतंत्र नेटवर्क कार्यरत असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे.

अमितेश कुमार, पोलिस आयुक्त, पुणे शहर

नीटसारख्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेच्या नावाखाली विद्यार्थ्यांना आणि पालकांना आमिष दाखवून लाखो रुपयांची उकळपट्टी केली गेली असण्याची शक्यता तपासली जात आहे. सीबीआय, पुणे पोलिसांची गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांकडून मोबाइल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार, बँक खात्यांची माहिती आणि आरोपींमधील संपर्क यांची पडताळणी सुरू असून या प्रकरणात आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वाघमारेच्या खात्यावर आले पैसे

पोलिसांनी वाघमारेचा मोबाइल फोन जप्त केला असून त्याच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. नीट परीक्षेच्या कालावधीतच तिच्या खात्यात सुमारे १० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. हे पैसे विद्यार्थ्यांकडून किंवा त्यांच्या पालकांकडून घेण्यात आले होते का, याचा तपास आता पोलीस करीत आहेत. तसेच, तिने मोबाइल मधील काही मेसेज डिलीट केले आहेत.

विद्यार्थी शोधण्याची जबाबदारी सोळंकीकडे?

पुणे पोलिसांनी बुधवारी (दि.१३) दुपारी मांजरी परिसरातून शेषराव सोळंकी या तरुणाला ताब्यात घेतले आहे. तो नामांकित महाविद्यालयात इंजिनिअरींगच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सोळंकीकडे नीट परीक्षेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांचा शोध घेणे, त्यांच्याशी संपर्क साधणे, अशी जबाबदारी होती का, त्यादृष्टीने पोलीस तपास करीत आहेत.

## बिबवेवाडीत अग्नीतांडव! ८ हजार चौरस फुटांचे गोडाऊन खाक

पुणे । प्रतिनिधी

बिबवेवाडीत अप्पर डेपोजवळ ८ हजार चौरस फुटांच्या मंडप साहित्याच्या गोडाऊनला बुधवारी (दि.१२) दुपारी भीषण आग लागली. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य तसेच आवारातील सात दुचाकी, एक टेम्पो भस्मसात झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत बचावकार्य केले. सुदैवाने, आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बिबवेवाडीतील सर्व्हे नं. ६५८, अप्पर डेपो येथे काळे अँड सन्स हे मंडप साहित्याचे गोडाऊन आहे. दुपारी १ वाजून २३ मिनिटांच्या सुमारास अचानक गोडाऊनला आग लागली. आत कापड, कार्पेट, प्लास्टिक आणि लाकडी सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीचे, धुराचे लोट परिसरात लांबून दिसत होते.

यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पथके तातडीने घटनास्थळी आली. दाट नागरी वस्ती आणि शेजारीच असलेल्या दुकानांमुळे आग पसरून मोठे नुकसान होण्याचा धोका होता. जवानांनी चारही बाजूंनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले.

मोहिमेत ७ अग्निशमन वाहने, महापालिकेचे ११ टँकर आणि पुणे कॅन्टोन्मेंटचे एक वाहन अशा मोठ्या यंत्रणेसह ५० जवानांनी भाग घेतला. मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी विजय भिलारे, समीर शेख, सुनील नाईकनवरे व कैलास शिंदे यांनी ही आग आटोक्यात आणळी. स्थानिक नागरिक, पोलीस आणि महावितरण कर्मचाऱ्यांनीही आग विझवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

## इंदापूरमध्ये २० तोळे सोन्याची बॅग परत; प्रामाणिकपणाचा आदर्श

बारामती । प्रतिनिधी

आजच्या महागाईच्या काळात पैसा महत्वाचा झाला आहे पण तो सहजासहजी मिळाला तर? कोणी सोडेल काय? आणि त्यातही जर ते चक्क ३० लाख रुपये असतील तर? अर्थात रस्त्यावर अशी हरवलेली वस्तू परत मिळणे अवघड मानली जाऊ शकते; मात्र इंदापूर तालुक्यातील पिंपळे येथील एका महिलेने तब्बल २० तोळे सोन्याचे दागिने मूळ मालकाला परत करून लाख मोलाचा प्रामाणिकपणाचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

या घटनेमुळे परिसरात त्या महिलेचे सर्वत्र कौतुक होत आहे. लता सुनील वाबळे (रा. पिंपळे फाटा, ता. इंदापुर) असे या प्रामाणिक महिलेचे नाव आहे. भर रस्त्यात सापडलेली



२० तोळे वजनाची सापडलेली बॅग तिने परत मूळ मालकाला स्वाधीन केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अकोले (ता. इंदापुर) येथील एक कुटुंब बुधवारी (दि. १३) पिंपळे येथील पद्मावती मंदिरात देवीच्या देवदर्शनासाठी आले होते. दर्शन घेऊन परत घरी आल्यानंतर त्यांना धक्का बसला, कारण त्यांच्याकडे सोबत असलेले २० तोळे सोने असलेली बॅगच त्यांना आढळून आली नाही. त्यामुळे त्यांनी विना विलंब आल्या रस्त्याने बॅगची शोधाशोध सुरू केली. अगदी ज्या पिंपळाच्या देवीच्या दर्शनासाठी आले तिथपर्यंत शोध घेतला पण पदरी निराशा आली. याच दरम्यान लता वाबळे यांना पद्मावती मंदिराजवळ नागरिक जमल्याची व कोणाची तरी सोने असलेली बॅग हरवल्याची चर्चा कानावर पडली. लता यांनी कसलीही उसंत न घेता नागरिक जमलेल्या ठिकाणी धाव घेतली आणि सकाळी ११ वाजता आपल्याला सोने असलेली बॅग सापडल्याची माहिती प्रामाणिकपणे दिली. हे शब्द ऐकताच आत्तापर्यंत धास्तावलेल्या त्या कुटुंबाच्या जीवात जीव आला. त्यानंतर उपस्थित नागरिकांच्या साक्षीने हरवलेले लाख मोलाचे सोने लता यांनी संबधित कुटुंबाच्या स्वाधीन केले.या प्रामाणिक घटनेचे कौतुक उपस्थित असलेल्या नागरिकांनी केले. शिवाय ही बाब भिगवण पोलिसांच्या कानावर आली आणि लता व सुनील या दाम्पत्याच्या प्रामाणिकपणाची दखल घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे, पोलिस उपनिरिक्षक अमित पाटील तसेच निश्चल शितोळे, विठ्ठल वारगड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक संतोष वाबळे आदी उपस्थित होते.

## हातात कोयते घेत टोल नाक्यावर दहशत, बुलेट गँगचा कारनामा समोर, घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**पुणे । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इथल्या बेलसर टोलनाक्यावर काही दुचाकीस्वारांनी हातात कोयते घेत दहशत माजवण्याचा प्रयत्न केला आहे. काल मध्य रात्री दोन वाजताच्या सुमारासचा हा प्रकार घडला आहे. टोल नाक्यावर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा सर्व प्रकार कैद झाला आहे. बुलेटचे फटाके काढत हातात कोयचे नाचवत जवळपास शंभरहून अधिक दुचाकी स्वारांनी या परिसरात दहशत माजवली आहे. त्यानंतर इथं भीतीचे वातावरण आहे. हे कृत्य बुलेट गँगने केल्याचे बोलले जात आहे. यांच्यावर कठोर कारवाई केली जावी अशी मागणी आता केली जात आहे.

दिवेघाटात ज्या बुलेट गँगने हातात कोयते नाचवले होते, त्याच बुलेट गँगचे हे कृत्य असावे असा



अंदाज लावला जात आहे. या संपूर्ण प्रकारांमुळे परिसरात भीतीचं वातावरण तयार झालं आहे. पोलिसांनी अशा टोळक्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी आता केली जात आहे. या गँगमध्ये शेकडो बुलेट आहेत. ते या परिसरात रात्रीच्या वेळी आपली दहशत निर्माण करत आहे. त्यातून आपला धाक दाखवण्याचा त्यांना प्रयत्न आहे. त्यासाठी ते कोयत्यांचाही वापर करताना दिसले आहेत. दिवेघाटात ही असात धिंगाणा या गँगने घातला होता. दरम्यान शेकडोच्या संकेत बुलेट गँगने काल रात्री पुण्यातील दिवे घाटात बुलेटच्या सायलेन्सरच्या माध्यमातून फटाके फोडत दहशत माजवली होती. यावेळी काही बुलेट स्वरांनी हातात कोयते नाचवले होते. इंदापूर तालुक्यातील सणसर येथील एका प्रवाशाने या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ आपल्या मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद केला होता. हा व्हिडिओ समाज माध्यमाचा प्रसारित झाल्यानंतर समाजातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. दिवेघाटातील तो व्हिडिओ आणि बेलसर टोल नाक्यावरील व्हिडिओ पाहता ही दोन्ही गँग एकच असल्याचं प्रथम दर्शनी तरी दिसून येत आहे. दोन्ही ठिकाणचे हे व्हिडिओ पाहता पुणे जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर बोट ठेवले जात आहे.पुणे आणि परिसरात सध्या अनेक गुन्हे होत आहेत. कधी कोयता गँग तर कधी टोळी युद्ध यामुळे पुणे नेहमीच चर्चेत आहे. काही वेळा कौटुंबिक हिंसाचाराने ही पुण्याचं नाव बदनाम झालं आहे. शहरातच नाही तर जिल्ह्यात ही अशाच काही घटना घडत आहेत. त्यात आता ही नवी बुलेट गँग समोर आली आहे. त्यामुळे पुणे ग्रामीण पोलीसांची डोकेदुखी नक्कीच वाढली आहे. त्यामुळे या गँगचा शोध घेवून त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याचे आव्हान पुणे ग्रामीण पोलीसांसमोर आहे. त्यांना मिळालेल्या व्हिडीओच्या आधारे ते आता काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा ३३ दिवसांचा प्रवास; यंदा माऊलींचे रिंगण कुठे-कधी होणार?

पुणे । प्रतिनिधी

आषाढी वारीसाठी वारकऱ्यांचे आराध्य दैवत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान ८ जुलै रोजी आळंदीतून होणार आहे. ३३ दिवसांच्या या पवित्र प्रवासानंतर हा सोहळा ८ ऑगस्ट रोजी पुन्हा आळंदीत परतणार आहे. आळंदी देवस्थानचे विश्वस्त आणि दिंडी समाज संघटन यांची बुधवार (१३) मे रोजी झालेली बैठक पार पडली, ज्यामध्ये या वर्षाच्या पालखी सोहळ्याचे सविस्तर वेळापत्रक निश्चित करण्यात आले.

पालखी सोहळा प्रमुख ड. राजेंद्र उमाप आणि प्रमुख



विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या सोहळ्यात परंपरेप्रमाणे तीन उभी रिंगणे आणि चार गोल रिंगणे होणार आहेत. तसेच पुणे आणि सासवडमध्ये सोहळ्याचा प्रत्येकी दोन दिवसांचा मुक्काम असेल. ८ जुलै रोजी देऊळवाड्यातून माऊलींच्या पालखीचे जल्लोषात प्रस्थान होईल. प्रस्थानाचा पहिला मुक्काम आळंदीतील नवीन दर्शन मंडपात असेल. त्यानंतर ९ जुलै आणि १० जुलै रोजी पालखी पुण्यात मुक्कामी असेल. सासवडमध्ये ११ जुलै आणि १२ जुलै रोजी मुक्काम करून सोहळा १३ जुलै रोजी जेजुरीला पोहोचेल. १४ जुलै रोजी पालखीचा मुक्काम वाल्हे येथे असेल. १५ जुलै रोजी माऊलींच्या पादुकांना निरा स्नान घालण्यात येणार असून त्याच दिवशी पालखी लोणंद येथे मुक्कामी असेल. पुण्यातील मुक्कामावरून काही काळ चर्चा सुरू होती. पण जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विठोबा मंदिरातील सुविधांबाबत लेखी हमीपत्र दिल्यानंतर, बुधवारी झालेल्या बैठकीत पुण्यातील मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरातच करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. यामुळे वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### रिंगण सोहळ्याचे वेळापत्रक

१. पहिले उभे रिंगण: चांदोबाचा लिंब – १६ जुलै

२. पहिले गोल रिंगण: पुरंदवडे – २० जुलै

३. दुसरे गोल रिंगण: खुडूस फाटा – २१ जुलै ४. तिसरे गोल रिंगण: ठाकुरबुवाची समाधी – २२ जुलै ५. दुसरे उभे रिंगण: बाजीरावची विहीर, वाखरी – २३ जुलै ६. चौथे गोल रिंगण: बाजीरावची विहीर, वाखरी – २३ जुलै

७. तिसरे उभे रिंगण: इसबावी, पंढरपूरजवळ – २४ जुलै

## जबरदस्ती घरात घुसले; मंगळसूत्र हिसकावलं; आळंदीत महिलेवर सामूहिक अत्याचार

आळंदी । प्रतिनिधी

आळंदी परिसरात एका महिलेला घरात घुसून मारहाण करत सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर समोर आला आहे. या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपींनी ७ एप्रिल रोजी तिच्या घरात घुसून गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेतलं. त्यानंतर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला. तसेच घर आमच्या नावावर कर, नाहीतर तुला आणि तुझ्या कुटुंबाला त्रास देऊ, अशी धमकीही दिल्याचं फिर्यादीत नमूद करण्यात आलं आहे. चार ते पाच महिन्यांपूर्वी आरोपी पीडितेच्या घरी आले होते. त्यावेळीही जबरदस्तीने शारीरिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचबरोबर पीडितेच्या नातेवाईकांशी गैरवर्तन आणि सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी दिल्याचाही दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी अभिमन्यू आंधळे, नारायण खंदारे, श्याम महाराज राठोड, राहुल चोरेडिया, कालिनाथ गुलाबराव घुले, युवराज खरमाटे आणि एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिघी पोलिसांनी गुन्हा नोंदवत पुढील तपास सुरू केला आहे. पिडीतेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, घरात घुसून आरोपींनी जबरदस्तीने महिलेवर सामूहिक लैंगिक अत्याचार केला आहे. ही घटना ७ एप्रिल २०२६ तसेच चार-पाच महिन्यांपूर्वी दिघी पोलिस ठाण्याच्या हद्दीत आळंदी येथे घडली आहे. पीडित महिलेने याप्रकरणी २४ एप्रिल २०२६ रोजी याप्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अभिमन्यू आंधळे, नारायण खंदारे, श्याम महाराज राठोड, राहुल सुरेश चोरडीया, कानीफनाथ गुलाबराव घुले, युवराज खरमाटे यांच्यासह एका महिलेच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित हे ७ एप्रिल रोजी पीडितेच्या घरात आले. त्यांनी पीडित महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र काढुन घेतले. त्यानंतर संशयितांनी पीडित महिलेवर लैंगिक अत्याचार केले. तसेच पीडितेला शिवीगाळ केली. 'हे तुझे घर आमच्या नावावर कर नाहीतर, ते घर विकून आम्हाला पैसे दे, नाहीतर आम्ही तुला असाच त्रास देत राहु, अशी धमकीही दिली.

## पुणे हॉस्पिटल बॉम्बप्रकरणात मोठी घडामोड; सीसीटीव्ही मधील व्यक्ती स्वत:हून चौकशीसाठी हजर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील हडपसर परिसरात एका रुग्णालयाच्या आवारात बॉम्बसदृश्य वस्तू आढळून आल्याने गुरुवारी सायंकाळी मोठी खळबळ उडाली होती. या घटनेनंतर पुणे पोलिस, बॉम्ब शोधक व नाशक पथक, दहशतवादविरोधी पथक आणि पुणे गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला. रात्री उशिरा ही संशयित वस्तू सुरक्षितपणे निकामी करण्यात पोलिसांना यश आले.

मिळालेल्या माहितीनुसार, हडपसरच्या मध्यवर्ती भागातील एका रुग्णालयात गुरुवारी (दि. १३) सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास ही घटना घडली. रुग्णालयाच्या बाथरूम परिसरात एका व्यक्तीला संशयास्पद वस्तू आढळून आली. सुरुवातीला ती वस्तू बॉम्बसदृश्य असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. संबंधित व्यक्तीने ती वस्तू बाहेर आणून ठेवली आणि तात्काळ पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाने परिसर ताब्यात घेत संशयित वस्तू मोकळ्या जागेत



हलवली आणि रात्री उशिरा ती सुरक्षितपणे निकामी केली. यामुळे संभाव्य धोका टळला असला, तरी या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, तपासादरम्यान समोर आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्या एका व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. संबंधित व्यक्ती हा एमआर असल्याचे समोर आले आहे. तो औषध कंपन्यांशी संबंधित कामानिमित्त नियमितपणे रुग्णालयात ये-जा करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे, सीसीटीव्ही मध्ये दिसणारी ही व्यक्ती स्वतःहून चौकशीसाठी पोलिसांकडे आल्याचे समजते. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्तीने, या घटनेशी माझा कोणताही संबंध नाही, असा दावा केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. पोलिस त्याच्या हालचाली, रुग्णालयातील उपस्थिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अधिक तपास करत आहेत. सध्या या प्रकरणाचा पुणे पोलिस, एटीएस, गुन्हे शाखा आणि बीडीडीएस संयुक्तपणे तपास करत आहेत. ही वस्तू नेमकी कोणी ठेवली? त्यामागचा उद्देश काय होता? आणि हा खरोखर कटाचा भाग होता की घबराट निर्माण करण्याचा प्रयत्न, याचा तपास सुरू आहे. या घटनेमुळे पुण्यातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, तपास यंत्रणांकडून सर्व बाजूंनी चौकशी सुरू आहे.

## हडपसरमध्ये प्रेमसंबंधांच्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

पुणे: आईच्या प्रियकराचा तरुणीच्या प्रियकराने साथीदारांच्या मदतीने खून केल्याचा धक्कादायक प्रकार हडपसरमधील काळेपडळ परिसरात समोर आला आहे. प्रेमसंबंध तोडण्यासाठी तरुणीच्या आईच्या प्रियकराने टाकलेला दबाब आणि धमकीमुळे हा खून करण्यात आल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. गणेश संजू बिरादार (वय २५, रा. ससाणेनगर, हडपसर) असे खून झालेल्याचे नाव आहे.

या प्रकरणी काळेपडळ पोलिसांनी तपास करून तरुणीच्या प्रियकरासह साथीदारांना अटक केली. या प्रकरणात अटकेत असलेला प्रियकर हा सराइत गुन्हेगार आहे. दुर्वांग उर्फ पारस सुनील मानकर (वय २१, रा. हिराबाग, शुक्रवार पेठ, टिळक रस्ता), पारस किशोर गायकवाड (वय २१, रा. दत्तवाडी, सिंहगड रस्ता), अभि उर्फ अभि संजय इंगळे (वय २२), सूरज रमेश दोरकर (वय २१), साहिल सागर शेलार (वय २४, सर्व रा. हडपसर), चंद्रशेखर सोमनाथ जावीर (वय २०, रा. सुखसागरनगर, कात्रज) यांना अटक करण्यात आली.

खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार दुर्वांग मानकर हा सराइत आहे. त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे पाच गुन्हे दाखल आहेत. दुर्वांग याचे एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते, तर गणेश याचे दुर्वांगच्या प्रेयसीच्या




आईसोबत प्रेमसंबंध होते. गणेश विवाहित होता. दुर्वांगची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने गणेशने तरुणीला त्याच्यासोबत असलेले प्रेमसंबंध तोडण्यास सांगितले होते. त्याने तिच्यावर दबाव आणला होता. त्याने तरुणीच्या आईला याबाबतची माहिती दिली होती. या कारणावरून दुर्वांग आणि गणेश यांच्यात तीन महिन्यांपूर्वी वाद झाले होते.

३ मे रोजी हडपसरमधील ससाणेनगर भागात असलेल्या इमारतीच्या परिसरात रात्री साडेदहाच्या सुमारास गणेश थांबला होता. त्या वेळी आरोपी दुर्वांग आणि साथीदार तेथे आले. त्यांनी गणेश याला शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. गणेश याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून आरोपी पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या गणेश याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी गणेश याच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीनुसार, काळेपडळ पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला.

पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तीन पथके तयार केली. पसार झालेल्या आरोपींना सापळा लावून वेगवेगळ्या भागांतून अटक करण्यात आली. आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, अण्णासाहेब बाबर, सहायक निरीक्षक अमित शेटे, अजय हंचाटे, हवालदार प्रवीण काळभोर, नीलेश देसाई, प्रतीक लाहिगुडे, दाऊद सय्यद, परशुराम पिसे, राजू वाघमारे, शाहिद शेख, बालू ठाकूर, राकेश साळुंके, अतुल पंधरकर यांनी ही कारवाई केली.